रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ३०६
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, २४ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## पुण्यातील हिट अँड रन प्रकरणाला वेगळे वळण



**पुणे :** पुण्यातील हिट अँड रन प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणी अल्पवयीन वेदांतला बाल सुधारगृहात ठेवण्यात आले आहे. त्याच्या वडिलांना म्हणजे विशाल अग्रवाल यांना अटक करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ आता वेदांतच्या आजोबांनाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. वेदांतच्या आजोबांची कसून चौकशी करण्यात येत आहे. एका जुन्या प्रकरणात ही चौकशी होत आहे. त्यामुळे अग्रवाल कुटुंब चांगलंच गोत्यात येणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. वेदांत अग्रवालचे हिट अँड रनचे प्रकरण घडल्यानंतर अग्रवाल कुटुंबाचे छोटा राजनशी संबंध असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाचीही गंभीर दखल घेतली आहे. पुणे गुन्हे शाखेने वेदांतचे आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांना पुणे पोलीस आयुक्तालयात बोलावले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

## अंतरंग

उरण शहरात मोकाट श्वानांच्या संख्येत वाढ/२
मोरा-भाऊचा धक्का रो-रोचे काम युद्धपातळीवर/३
मलेशिया मास्टर्स स्पर्धेत सिंधूची विजयी सलामी /८

# डोंबिवली एमआयडीसीत भीषण स्फोट

## आठ कामगार ठार, ६८ जण जखमी; परिसरात धूर अन् काचा

**डोंबिवली : प्रतिनिधी**

डोंबिवली एमआयडीसीत केमिकल कंपनीमध्ये झालेल्या स्फोटात आठ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून जवळपास ६८ कामगार जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करत आहे. घटनास्थळी आगीच्या ज्वाळा आणि धुराचे मोठ्या प्रमाणावर लोट असल्याने बचाव कार्यात अडथळे येत आहे. या दुर्घटनेत मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. उद्योगमंत्री उदय सामंत आणि कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी घटनास्थळी जाऊन बचावकार्याची माहिती घेतली तसेच यंत्रणेला सूचना केल्या.

डोंबिवली एमआयडीसी फेज दोन मधील अंबर केमिकल कंपनीच्या बॉयलरमध्ये दुपारी १ वाजताच्या सुमारास मोठा स्फोट झाला. डोंबिवलीत अनेक किलोमीटरपर्यंत या स्फोटाचे हादरे जाणवले. परिसरातील अनेक इमारतींच्या काचा फुटल्या आहेत. स्फोट इतका भयंकर होता की त्याचा आवाज तीन ते चार किमीपर्यंत पोहचला. तसेच या स्फोटामुळे जवळपास दीड किमी परिसरातील सोसायट्यांच्या खिडक्या फुटल्याचे दिसून आले. या स्फोटामधील बॉयलरचे तुकडे हे दीड-दोन किमीपर्यंत उडून गेले.

घटना घडल्यानंतर काही वेळातच अग्निशमन दलाच्या पाच गाड्या घटनास्थळी पोहचल्या. आग नियंत्रण आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र आगीच्या ज्वाळा आणि धुराचे मोठ्या प्रमाणावर लोट असल्याने बचावकार्यात अडथळ येत आहेत.

मंत्री उदय सामंत यांनी डोंबिवली एमआयडीसी येथील दुर्घटनास्थळी भेट देऊन मदतकार्याचा आढावा घेतला. या दुर्घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च सरकारतर्फे करण्यात येणार आहे. या दुर्घटनेची संपूर्ण चौकशी केली जाईल, अशी माहितीही मंत्री सामंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



> बॉयलरचा स्फोट झाल्यामुळे कंपनीत आग लागली. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो आहोत. जखमींना आम्ही विविध रुग्णालयात दाखल केले आहे. येत्या सहा महिन्यांत इथल्या अतिधोकादायक केमिकल तयार करणाऱ्या कंपन्या शहराबाहेर कशा नेता येतील यावर आम्ही लक्ष केंद्रीत करणार आहोत.
>
> **-डॉ. श्रीकांत शिंदे,** खासदार

### अतिधोकादायक कंपन्या तत्काळ होणार बंद

मानवी जीविताला हानीकारक ठरणाऱ्या डोंबिवली एमआयडीसीतील अतिधोकादायक कंपन्या तत्काळ बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अतिधोकादायक कंपन्यांना पर्याय म्हणून त्यांनी आपल्या कंपनी उत्पादन प्रक्रियेत अभियांत्रिकी, कापड किंवा अन्य बदल करून ते आहे त्या जागेत चालू ठेवावेत. संबंधीत विभागाशी आणि एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल. मृतांच्या नातेवाईकांना सरकारकडून पाच लाखांची मदत मिळेल, असे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीच्या स्फोटाच्या घटनेबाबत सांगितले.

### प्रत्यक्षदर्शींनी सांगितली दुर्घटनेची भयानकता

भीषण स्फोटानंतर बाहेर पडलेल्या एका कामगाराने सांगितले की, स्फोट झाला ती आमच्या बाजूची कंपनी होती. इतका मोठा स्फोट होता की, आम्ही सगळे बाहेर पडलो. सगळे आगीचे लोळ येत होते. आमच्या हाताला भाजले आहे. काही प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मोठे स्फोट झाले, दोन ते तीन किलोमीटरपर्यंत हादरे जाणवले. अनेकांच्या घरांच्या काचेच्या खिडक्या फुटल्या आहेत.

# प्रवरा नदीतील बचावकार्यात ३ जवानांचा मृत्यू

**अहमदनगर : प्रतिनिधी**

अकोले तालुक्यातील सुगाव बुद्रुक गावाजवळील प्रवरा नदीपात्रात बुडालेल्या तरुणाचा शोध घेण्यासाठी पाण्यात उतरलेल्या एसआरडीएफ पथकाची बोट उलटून तीन जवानांचा बुडून मृत्यू झाला.

२२ मे रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास संगमनेर तालुक्यातील अर्जुन रामदास जेड्गुले (वय १८) आणि सिन्नर तालुक्यातील सागर पोपट जेड्गुले (वय २५) हे दोन तरुण अंघोळीसाठी सुगाव बुद्रुक जवळील प्रवरा नदी पात्रात आले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने दोघे बुडाले. पोलिसांनी सागरचा मृतदेह बाहेर काढला, मात्र अर्जुनचा शोध लागला नव्हता. गुरुवारी (दि. २३) धुळे येथून एसआरडीएफ पथकाचे पाच जवान आणि त्यांच्या मदतीला एक स्थानिक नागरिक बोट घेऊन पाण्यात उतरले. पाण्यात भोवरा निर्माण होऊन एसआरडीएफ पथकाची बोट पलटली आणि पाहताक्षणी सहाही जण पाण्यात बुडाले. यातील तीन जवानांनी जीव गमावला तर दोघांचे प्राण वाचले आहे.



## पाताळगंगा नदीत बुडून एकाचा मृत्यू

**मोहोपाडा :** रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी हद्दीत कराडे खुर्द गावच्या हद्दीमध्ये पाताळगंगा नदीपात्रात एका ५८ वर्षीय व्यक्तीचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली.

याबाबत प्रकाश काशिनाथ माळी (रा. तुराडे) यांनी रसायनी पोलीस ठाण्यात माहिती दिली. यामध्ये कुमार बाबू आवळे (वय ५८, रा. गोरेगाव, मुंबई) यांचा चावंढोली स्मशानभूमीच्या बाजूला असलेल्या दिवटा नावाच्या जागेमध्ये विटभट्टीच्या पुढे असलेल्या पाताळगंगा नदीच्या पात्रात मृतदेह आढळून आला. त्यास शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, चौक येथे पाठविण्यात आले आहे.

याबाबत सीआरपीसी १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोसई मिनल शिंदे अधिक तपास करीत आहेत.

## पुण्यातही सख्ख्या भावंडांचा बुडून अंत

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील पाबळमध्ये आजोबांसोबत शेततळ्यात पोहायला गेलेल्या दोघांचा मृत्यू झाला आहे. आर्यन नवले आणि आयुष नवले अशी या दोन मुलांची नावे आहेत. ते दोघेही साधारण १३ वर्षांचे होते. आर्यन नवले आणि आयुष नवले पाण्यात पोहण्यासाठी शेततळ्यात उतरले, पण त्या दोघांनाही पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे ते दोघेही पाण्यात बुडाले. त्यांना तातडीने पाण्यातून बाहेर काढण्यात आहे. दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

## 'उजनी'त बुडालेल्या सहा जणांचे मृतदेह ३६ तासांनंतर सापडले

**सोलापूर : प्रतिनिधी**

उजनी धरणात करमाळ्यातील कुगाव आणि इंदापूर तालुक्यातील कळाशी या गावादरम्यान बोट उलटून बुडालेल्या सहा जणांचे मृतदेह सुमारे ३६ तासांनी सापडले. यामध्ये एकाच कुटुंबातील चौघांसह करमाळ्यातील आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या माजी अध्यक्षांच्या मुलाचा समावेश आहे.

दरम्यान, या सहा जणांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी करमाळा उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. एनडीआरएफचे पथक व स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने हे शोधकार्य पार पडले. गोकुळ जाधव, कोमल जाधव या पती पत्नीसह तीन वर्षांची मुलगी वैभवी (माही), दीड वर्षाचा मुलगा शुभम जाधव (सर्व रा. झरे, ता. करमाळा, जि. सोलापूर), तर आदिनाथ सहकारी साखर काखान्याचे माजी अध्यक्ष धनंजय डोंगरे यांचे चिरंजीव गौरव डोंगरे आणि बोटचालक अनुराग अवघडे (दोघेही रा. कुगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर) या सहाही जणांचे मृतदेह गुरुवारी सकाळी हाती लागले आहेत.

## निवडक

### शेअर बाजार तेजीत; निफ्टीची पहिल्यांदाच झेप

**मुंबई :** एकीकडे लोकसभा निवडणुकीमुळे बाजारात काहीशी अस्थिरता आहे, मात्र गुरुवारी (दि. २३) शेअर बाजारात मोठी तेजी पाहायला मिळाली. इतिहासात पहिल्यांदाच निफ्टीने २२८०० अंकाच्याही पुढे झेप घेतली, तर सेन्सेक्समध्येही ८१६ अंकांची तेजी पाहायला मिळत आहे.

### मुंबई विद्यापीठाचा बीएससी सत्र ६चा निकाल जाहीर

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाने एप्रिल २०२४ मध्ये घेतलेल्या उन्हाळी सत्रातील तृतीय वर्ष बीएससी सत्र ६ या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. या परीक्षेत २०९८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यापीठाने वाणिज्य शाखेच्या निकालाबरोबरच विज्ञान शाखेचा निकालही ३० दिवसांच्या आत जाहीर केला आहे. विद्यापीठाने आजपर्यंत २०२४ च्या उन्हाळी सत्राचे ५३ निकाल जाहीर केले आहेत. या परीक्षेचे निकाल विद्यापीठाचे संकेतस्थळ http://www.mumresults.in/ यावर प्रदर्शित करण्यात आले आहेत.

# काँग्रेसचे सरकार सात जन्मात येणार नाही -पंतप्रधान मोदी

**हरियाणा : वृत्तसंस्था**



लोकसभा निवडणूक २०२४च्या सहाव्या टप्प्यातील प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हरियाणातील महेंद्रगड येथे पोहचले. याच दरम्यान मोदींनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेसचे सरकार सात जन्मातही येणार नाही. काँग्रेसला दिलेले प्रत्येक मत वाया जाईल, असे म्हणत त्यांनी टीकास्त्र सोडले आहे.

इंडिया आघाडीवर निशाणा साधताना मोदी म्हणाले की, गाय दूध देत नाही तोवर तूप खाण्यासाठी इंडिया आघाडीतील लोकांमध्ये भांडणे सुरू झाली आहेत. पाच वर्षांत पाच पंतप्रधान होतील, असे सांगितले जात आहे. पाच वर्षांत पाच पंतप्रधान, हरियाणाचे लोक पाच हजार विनोद बनवतील. इंडिया आघाडीचे लोक अत्यंत जातीयवादी, घराणेशाहीवाले आहेत.

मला राजकारणाची समज हरियाणा आणि पंजाबमधूनही मिळाली. मी हरियाणामध्ये १९९५ मध्ये आलो. मी येथील माता-भगिनींच्या हातचे अन्न खाल्ले आहे. आता मोदींना तुमचे हे कर्ज फेडण्यासाठी खूप काम करायचे आहे. आपल्या हरियाणाला नव्या उंचीवर घेऊन जायचे आहे. यासाठीच पुन्हा एकदा मोदी सरकार गरजेचे आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी उत्तर प्रदेशातील श्रावस्तीमध्ये समाजवादी पक्षावर जोरदार हल्लाबोल केला. मोदी म्हणाले की, रॅलीतील गर्दी आणि उत्साह हे स्पष्टपणे दर्शविते की सपा-काँग्रेसची इंडिया आघाडी ही पूर्णपणे कोलमडली आहे. संपूर्ण देश एकच गोष्ट म्हणत आहे, पुन्हा एकदा मोदी सरकार. काल मी एक व्हिडीओ पाहत होतो, ज्यामध्ये लोक स्टेजवर धावत आणि चढत होते.

व्हिडीओ पाहून मी विचारले, हा गोंधळ का सुरू आहे? तर त्यांनी सांगितलं की, सपा आणि काँग्रेसचे लोक रॅलीत लोकांना आणण्याचे कॉन्ट्रॅक्ट देतात. प्रति व्यक्ती पैसे देतात, पण त्यांनी पैसे दिले नाहीत, म्हणून लोक धावत येऊन स्टेजवर चढले. आता अशी स्थिती असलेला पक्ष तुमचे भले कसे करू शकेल? असेही पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे.

## देवनदी बंधाऱ्यात बुडून दहावीतील दोन मुलांचा मृत्यू

**नाशिक : प्रतिनिधी**

सिन्नर शहरापासून जवळच असलेल्या कुंदेवाडीजवळील देवनदी बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या इयत्ता दहावीतील दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला. सिन्नरमधील आंबेडकर नगरचे दोघे रहिवासी आहेत. गुरुवारी (दि. २३) दुपारी साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली.

सार्थक जाधव आणि अमित जाधव हे दोघे मित्रांसह कुंदेवाडी येथील देवनदीवरील बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही बुडाले. सोबतच्या मित्रांनी आरडाओरड केल्यावर मदतीसाठी परिसरातील नागरिक धावले. पोलिसांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी मदतकार्य सुरू केले. दोघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले. अमित आणि सार्थक या दोघांनी इयत्ता १० वीची परीक्षा दिली होती. प्रवीण जाधव, लखन खरताळे, राम जाधव, अमोल जाधव, रोहन भावसार, शरद जाधव, नवनाथ बर्डे आदी तरुणांनी मदतकार्य केले.

## मुंबईतही अल्पवयीन मुलाने एकाला उडवले

**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्यातील कोरेगाव पार्क येथील कल्याणीनगरमधील झालेला अपघात चर्चेत असताना मुंबईमध्येही अल्पवयीन मुलाने एकाला उडवले असून इरफान शेख नावाच्या ३२ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

पोलिसांनी मुलाच्या वडिलांना जेजे मार्ग येथून अटक केली आहे. अल्पवयीन मुलाची डोंगरीच्या बाल सुधारकारगृहात रवानगी करण्यात आली आहे.

## छत्तीसगडमधील चकमकीत सात नक्षलवाद्यांना कंठस्नान

**छत्तीसगड : वृत्तसंस्था**

छत्तीसगडच्या दंतेवाडामध्ये पुन्हा एकदा सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. गुरुवारी (दि. २३) झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी सात नक्षलवाद्यांना ठार केले. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांकडून अनेक शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.

सध्या परिसरात सुरक्षा दलांची शोध मोहीम सुरू आहे, दोन्ही बाजूंनी अधूनमधून गोळीबार सुरू आहे. मृतांचा आकडा वाढूही शकतो.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या छत्तीसगडमध्ये एसओजी, डीआरजी, सीआरपीएफ, बीएसएफ आणि कोब्रा कमांडोसह सुमारे एक हजार जवानांचे पथक नक्षलवाद्यांविरोधात ऑपरेशन चालवत आहे. अलिकडेच कांकेर, बस्तर आणि विजापूरमध्ये सुरक्षा दलांनी केलेल्या चकमकीत मोठ्या प्रमाणात नक्षलवादी मारले गेले. काही जवानही जखमी झाले आहेत.

# मराठवाड्यातील पाणी पातळी वाढवण्यासाठी एनजीओंची मदत घेणार -मुख्यमंत्री शिंदे

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

मराठवाड्यात दुष्काळ सदृश्य स्थिती पाहता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. २३) तातडीने छत्रपती संभाजीनगरात येऊन आढावा बैठक घेतली. चारा, पाणी, टँकर याची कुठेही कमतरता भासू देऊ नका, अशा स्पष्ट सूचना त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला दिल्या. मराठवाड्यातील पाणी पातळी वाढवण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या एनजीओंची मदत घेणार असल्याचेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असल्यामुळे मराठवाडा व राज्यातील ज्या ज्या भागात पाणी, चारा टंचाई किंवा अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करता येत नाहीये. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या वतीने निवडणूक आयोगाकडे महाराष्ट्रातील आचारसंहिता शिथील करण्याची मागणी केली होती. यावर अद्याप निर्णय झालेला नसला तरी मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीचा विचार करता गुरुवारी तातडीने आढावा बैठक घेतली.



छत्रपती संभाजीनगरात झालेल्या या बैठकीची माहिती माध्यमांना देतांना मुख्यमंत्री शिंदे यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय राज्य सरकारने घेतले असल्याचे सांगितले. मराठवाड्यातील जमिनीतील पाणीपातळीत वाढ करण्यासाठी या विषयावर काम करणाऱ्या एनजीओसोबत सरकारने काम सुरू केले आहे. यात प्रामुख्याने अमीर खान यांची नाम फाऊंडेशन, आप्पासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्यासह अनेक संस्थाची मदत घेतली जाणार आहे. गाळमुक्त धरण आणि गाळमुक्त शिवार करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

### नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळणार

प्रमुख पुरवठादाराची माहिती घेऊन तपासणी केली जाईल. बोगस बियाणांच्या विक्रीवर पुर्णपणे सरकारची यंत्रणा नजर ठेवून राहील त्यामुळे शेतकऱ्यांना अडचण येणार नाही. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पंचनामे करून नुकसान भरपाई दिली जाईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## पुण्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**पुणे : प्रतिनिधी**

पुढील दोन ते तीन दिवस पुण्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. पुण्यासह राज्यातदेखील अनेक शहरांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पुणेकरांनी पुढील दोन दिवस उन्हापासून काळजी घेण्याला सल्ला हवामान खात्याने दिला आहे.

भारतीय हवामान विभागाचे (आयएमडी) हवामान अंदाज विभागाचे माजी प्रमुख अनुपम कश्यपी यांनी सांगितले की, पुण्यातील उष्णतेच्या लाटेची स्थिती हळूहळू पावसात घट होईल. महाराष्ट्रात आता दोन दिवस पाऊस कमी होण्याची शक्यता आहे आणि तो प्रामुख्याने राज्याच्या दक्षिणेपर्यंत मर्यादित राहील. त्यामुळे पुण्यातील तापमानात वाढ आणि उष्णतेची लाट निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# काँग्रेसचे स्नेहभोजन; ठाकरे गट नाराज

**सांगली : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीत सांगली लोकसभा मतदारसंघाच्या जागेवरून धुसफूस सुरू होती, मात्र त्यानंतर ठाकरे गटाने चंद्रहार पाटील यांना उमेदवारी दिली. तसेच काँग्रेसचे विशाल पाटील यांनी अपक्ष निवडणूक लढवली. लोकसभा निवडणूक पार पडल्यानंतर आता काँग्रेसने स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. या स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाला विशाल पाटील यांनी हजेरी लावल्यामुळे ठाकरे गटाने नाराजी व्यक्त केली. तसेच शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संजय विभुते यांनी यावरून आता थेट काँग्रेसला इशारा दिला आहे.

सांगलीमध्ये काँग्रेसने निवडणुकीच्या पहिल्या दिवसापासून गद्दारी केली. राष्ट्रवादी काँग्रेसने सुरुवातीला मदत करण्याची भूमिका घेतली, परंतु शेवटी राष्ट्रवादी काँग्रेसही विशाल पाटील यांच्यासोबत गेली. काँग्रेसचे स्नेहभोजन म्हणजे अधिकृत गद्दारी केल्याचा पुरावा आहे, अशी टीका संजय विभुते यांनी केली.

### 'आता काँग्रेसला विधानसभेत मदत नाही'



संजय विभुते पुढे म्हणाले, काँग्रेसने पृथ्वीराज पाटील यांची हकालपट्टी करावी, काँग्रेसने विशाल पाटील यांची हकालपट्टी केली नाही म्हणजेच गल्लीपासून दिल्लीपर्यंतची काँग्रेस ही विशाल पाटील यांच्या पाठीशी होती. सांगलीमध्ये महाविकास आघाडी टिकवायची असेल तर विशाल पाटील आणि पृथ्वीराज पाटील यांची तातडीने काँग्रेसने हकालपट्टी करावी, अन्यथा सांगलीत महाविकास आघाडी राहणार नाही. येणाऱ्या विधानसभेमध्ये काँग्रेसच्या नेत्यांना विधानसभेचे तोंड बघू देणार नाही, अशी शपथ शिवसेनेने घेतली आहे, असा इशारा संजय विभुते यांनी दिला.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भांडण संपले पाहिजे, परंतु ते शेवटपर्यंत जिवंत ठेवण्याचे काम काँग्रेसने केले. काँग्रेसने आता सांगलीत शिवसेना (उबाठा) कडून मदतीची अपेक्षा ठेवू नये. आमची लायकी निवडून येणारी नसली तरी तुम्हाला पाडण्याची लायकी नक्कीच आहे, असा थेट इशारा संजय विभुते यांनी दिला.

# इंडिया आघाडीचा संविधानविरोधी चेहरा उघड

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा घणाघात

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम बंगालमध्ये २०१०नंतर देण्यात आलेली ओबीसी प्रमाणपत्रे रद्द करण्याचा आदेश देऊन कोलकाता उच्च न्यायालयाने पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तुष्टीकरणाच्या राजकारणाला जोरदार चपराक लगावली आहे. न्यायालयाचा निर्णय आपण मानणार नाही असे जाहीर करून ममता बॅनर्जी यांनी आपला संविधानविरोधी चेहरा दाखवून दिला आहे, अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली आहे. ओबीसी, आदिवासी, दलित समाजाचे आरक्षण मुस्लिमांना देण्याचा कट भाजप यशस्वी होऊ देणार नाही, असा इशाराही बावनकुळे यांनी दिला आहे.



प्रसिद्धीपत्रकात बावनकुळे यांनी म्हटले की, एका जनहित याचिकेवर निकाल देताना २०१० ते २०२४ या काळात पश्चिम बंगाल सरकारने दिलेली ओबीसी प्रमाणपत्रे रद्द करण्याचा आदेश कोलकाता उच्च न्यायालयाने दिला आहे. पश्चिम बंगालमध्ये रोहिंग्या मुस्लिमांना आणि बांगलादेशातून भारतात आलेल्या घुसखोरांना ओबीसी प्रमाणपत्र मिळाले असल्याचे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाला आढळून आले. ममता बॅनर्जी सरकारने कोणतेही सर्वेक्षण न करता ११८ मुस्लिम जातींना थेट ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करून त्यांना आरक्षण दिले. संविधानात धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याची तरतूद नसतानाही ममता बॅनर्जी सरकारने ओबीसी समाजाचे आरक्षण काढून ते मुस्लिमांना दिले. न्यायालयाने दिलेला निर्णय आपल्याला मान्य नसून यापुढेही याच पद्धतीने ओबीसी आरक्षणातून मुस्लिमांना आरक्षण दिले जाईल, असे जाहीर करून ममता बॅनर्जी यांनी आपला संविधानविरोधी चेहरा दाखवून दिला आहे. यातून तृणमूल काँग्रेस आणि इंडिया आघाडी ओबीसी समाजाला आरक्षण देण्याच्या विरोधात असल्याचे स्पष्ट होत आहे.

काँग्रेसने दलित, आदिवासी, ओबीसी समाजाच्या विकासाकडे नेहमीच दुर्लक्ष केले. अनेक वर्षे सत्तेत असलेल्या काँग्रेसने राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाला संविधानिक दर्जा दिला नव्हता. मोदी सरकारने मागासवर्गीय आयोगाला संविधानिक दर्जा देऊन ओबीसींच्या हक्काचे रक्षण केले. न्यायालयाचा अवमान, संविधानाचा अपमान आणि पश्चिम बंगालच्या जनतेचा विश्वासघात करणाऱ्या ममता बॅनर्जी यांचे तुष्टीकरणाचे राजकारण यापुढे जनता खपवून घेणार नाही. लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये ३०पेक्षा अधिक जागी भाजपला विजयी करून मतदार ममता बॅनर्जींना धडा शिकवतील, असेही बावनकुळे यांनी पत्रकात नमूद केले आहे.

राहुल गांधी यांना नुकत्याच एका कार्यक्रमात इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि सोनिया गांधी यांनी दलित, मागास वर्गाच्या न्याय मागण्यांकडे दुर्लक्ष केले हे मान्य करावे लागले, याकडे बावनकुळे यांनी लक्ष वेधले आहे.

# फास्टफूडऐवजी बाजरीच्या सुपरफूडचा पर्याय

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पालकांना सल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

लहान मुलांमधील वाढत्या लठ्ठपणाला फास्टफूड कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुलांसाठी तृणधान्यापासून सुपरफूड बनविण्याचा निर्धार केला आहे. सुपरफूडच्या माध्यमातून मुलांना एक उत्तम पर्याय उपलब्ध होईल, असा आशावाद उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जागतिक बाल लठ्ठपणा दिनानिमित्त जनरेशन एक्सएल ओबेसिटी फाउंडेशनचे संस्थापक डॉ. संजय बोरुडे यांनी विशेष चर्चासत्राचे आयोजन केले होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मनसे प्रमुख राज ठाकरे उपस्थित होते. या वेळी जनरेशन एक्सएल ओबेसिटी फाउंडेशनच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले.



महाराष्ट्रात कमी वजनाची, कुपोषित बालके, तसेच शहरी जीवनशैलीमुळे लहान मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण वाढले आहे, अशा दोन टोकाच्या गोष्टी पहायला मिळतात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या आयुष्मान भारत योजनेंतर्गत गर्भवती महिला आणि जन्माला येणाऱ्या बालकांची काळजी घेण्याबरोबरच मुलाच्या पौगंडावस्थेवरही लक्ष दिले आहे. राष्ट्रीय किशोर आरोग्य कार्यक्रमांतर्गत किशोरवयीन मुलांना निरोगी राहण्यास मदत केली आहे.

मुलांचा लठ्ठपणा ही एक समस्या आहे. त्यामुळे प्रत्येक शाळेतील किमान दोन शिक्षकांना यादृष्टीने प्रशिक्षित करावे, मुलांचा लठ्ठपणा, पोषण आणि इतर योजनांबाबत सखोल माहिती असलेली मंडळी अशा मुलांना ओळखण्यास सक्षम असावी आणि त्यांनी अशा मुलांच्या पालकांचे समुपदेशन करावे. हा उपक्रम संपूर्ण भारतातील शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे.


शाळांनी मुलांसाठी पीटीचा तास सक्तीचा करावा. क्रीडांगण नसलेल्या शाळांना परवानगी देऊ नये, तसेच क्रीडा उपक्रमही अभ्यासक्रमाचाच भाग बनवण्यात आले असल्याची माहिती उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

# उरण शहरात मोकाट श्वानांच्या संख्येत वाढ

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील भटक्या श्वानांची संख्या वाढू लागली आहे. याकडे उरण नगर परिषदेचे दुर्लक्ष होत असून मागील दोन वर्षांपासून श्वानांचे निर्बिजीकरण बंद केले आहे, मात्र पुन्हा एकदा ही प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात रहावी याकरिता नगर परिषद विविध उपाययोजना राबवित असते. त्याचाच एक भाग म्हणजे श्वानांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्यासाठी त्यांचे निर्बिजीकरण करण्यात येते. यासाठी उरण नगर परिषदेकडे यंत्रणा उपलब्ध आहे. असे असले तरी मागील दोन वर्षांत ही निर्बिजीकरणाची प्रक्रिया बंद आहे. त्यामुळे शहरातील नाक्यानाक्यावर असलेल्या कचराकुंड्या, मोकळी ठिकाणे, त्याचप्रमाणे रस्ते आणि शहरातील सार्वजनिक ठिकाणीही मोकाट श्वानांची संख्या लक्षणीय वाढली आहे.



श्वानांच्या दंशाने रेबीज होऊन दगावण्याची शक्यता असते. त्यामुळे नगर परिषदेने तातडीने श्वानांच्या संख्येला आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

**उरण नगर परिषदेच्या माध्यमातून शहरातील मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात येणार आहे. त्यासाठी निविदा काढून जुलैपर्यंत काम पूर्ण करण्यात येईल.**
**-समिर जाधव, मुख्याधिकारी, उरण नगर परिषद**

# 'शिक्षकांची सेवापुस्तके नव्याने तयार करावीत'

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाडमधील शिक्षकांच्या सेवापुस्तकांचा प्रश्न आता मार्गी लागला आहे. यासंदर्भात शिक्षक परिषदेने केलेल्या पाठपुराव्याला यश आहे. पुराच्या पाण्यात भिजून खराब झालेली सेवापुस्तके नव्याने तयार करण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिले आहेत.




महाड तालुक्यामध्ये २१ व २२ जुलै २०२२ रोजी महापूर आला होता. यात महाड पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील असणारी सेवापुस्तके पूर्णपणे भिजून जीर्ण झाली होती. काही सेवा पुस्तकांची पाने पावसाने खराब झाली होती. शिक्षकांच्या गंभीर प्रश्नाची दखल महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागातर्फे घेण्यात आली.

राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकाऱ्यांना वेळोवेळी निवेदन दिले. या मागणीची दखल जिल्हा परिषदेने घेतली आहे. महाड पंचायत समिती शिक्षण विभागाला सेवापुस्तके पुन्हा एकदा भरून नव्याने नोंदी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे शिक्षकांच्या खराब झालेल्या सेवापुस्तकांची नव्याने नोंद होऊन व स्वाक्षरी होऊन मिळणार आहे. याबद्दल महाड तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, महाडच्या गटशिक्षणाधिकारी डॉ. सुनिता चांदोरकर यांच्यासह शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांचे आभार शिक्षक परिषदेचे जिल्हा नेते उदय गायकवाड, अलिबाग शिक्षक पतपेढीचे संचालक वैभव पिंगळे यांनी मानले आहेत.

# पुण्यात आता मध्यरात्रीनंतर नाकाबंदी

## ८५ मद्यपी वाहनचालकांवर कारवाई



**पुणे : प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर वाहतूक पोलिसांनी मद्यपी वाहनचालकांविरूद्ध कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी मुंढवा, कोरेगाव पार्क, येरवडा, विमाननगरसह शहरातील वेगवेगळ्या भागात नाकाबंदी करून ८५ मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई केली. मध्यरात्रीनंतर शहरात होणारे अपघात, तसेच मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी आता अचानक नाकाबंदी करण्यात येणार आहे.

कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर वाहतूक पोलिसांनी मध्यरात्री वाहतुकीचे नियम धुडकावून भरधाव वेगाने वाहन चालविणारे, तसेच मद्यपी वाहनचालकांविरूद्ध कारवाई सुरू केली आहे. वाहतूक पोलीस, तसेच स्थानिक पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी मध्यरात्री १२ वा. नंतर पहाटेपर्यंत शहरातील वेगवेगळ्या भागात नाकाबंदी केली.

वेगवेगळ्या भागात बुधवारी पहाटेपर्यंत कारवाई करून १२५५ वाहनचालकांची तपासणी केली. या कारवाईत ८५ वाहनचालकांनी मद्यप्राशन केल्याचे उघडकीस आले. त्यांच्याविरूद्ध खटले दाखल करण्यात आले असून, वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांविरूद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख २२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. येरवडा, विमाननगर, चतु:शृंगी, मुंढवा, कोरेगाव पार्कसह वेगवेगळ्या भागात ही कारवाई करण्यात आली.

# घोडबंदर घाट रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अवजड वाहनांना बंदी

**ठाणे : प्रतिनिधी**

घोडबंदर मार्गावरील गायमुख घाटातील ७०० मीटर लांब रस्त्याची दुरुस्ती करून डांबरीकरण केले जाणार आहे. शुक्रवार (दि.२४)पासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हे काम हाती घेतले जाणार आहे. त्यामुळे ठाणे वाहतूक पोलिसांनी घोडबंदर मार्गावर अवजड वाहनांना बंदी घातली आहे. ६ जूनपर्यंत ही प्रवेशबंदी असेल.




मुंबई, गुजरात, भिवंडी आणि उरण येथील जेएनपीटी बंदरातून दररोज हजारो अवजड वाहनांची वाहतूक घोडबंदरमार्गे होते. या मार्गावरून मुंबई, वसई, विरार, भाईंदर भागातून वाहतुक करणाऱ्या हलक्या वाहनांचे प्रमाणही अधिक आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या दुरुस्तीचा निर्णय घेतला होता. अखेर शुक्रवारपासून या कामास सुरूवात होणार आहे. या कामाच्या कालावधीत कोंडीची शक्यता असल्याने अवजड वाहनांना घोडबंदर मार्गावर प्रवेशबंदी करण्यात आली आहे. येथील अवजड वाहनांची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविली आहे.

# पनवेल रेल्वेस्थानकात सुविधांचा अभाव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानक सध्या मोठे जंक्शन म्हणून ओळखले जाते. लांब पल्ल्याच्या गाड्यादेखील येथे थांबत असल्याने प्रवाशांची मोठी गर्दी येथे असते, परंतु या ठिकाणी असलेल्या नागरी सुविधांच्या अभावामुळे प्रवासी वर्ग चांगलाच त्रस्त झाला असून आबाल वृद्धांचे हाल होत आहेत.



पनवेल रेल्वेस्थानकातील प्लॅटफॉर्म क्र. ५, ६, ७वर असलेले मोठमोठे पंखे फक्त नावापुरतेच आहेत का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे, तसेच या ठिकाणी सुसज्ज बैठक व्यवस्था तसेच पंख्यांची डागडुजी करण्याची मागणी केली जात आहे. त्याचप्रमाणे सरकते जीने येथेसुद्धा मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने प्रवासी एकमेकांना धक्का लागून खाली पडण्याच्या घटना नियमित घडत आहेत. त्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

यासाठी या ठिकाणी रेल्वे पोलीस कायमस्वरुपी तैनात करावेत, अशी मागणी प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मे महिना म्हटला की, प्रचंड उकाडा जाणवू लागलेला आहे आणि त्यात मे महिन्याची सुट्टी असल्याने लोकांची गावी तसेच सुट्टीला बाहेर फिरायला जाण्याची मोठी धावपळ रेल्वेस्थानकात पहायला मिळत आहे.

सध्या मार्गावरील मेल एक्सप्रेस गाड्या तासन्तास उशिराने धावत असल्याने प्रवाशांना रेल्वेस्थानकावर गाड्यांची वाट पहावी लागत आहे, मात्र या प्रवाशांची येथे मोठी गैरसोय होताना दिसत आहे.

या ठिकाणी असलेल्या शौचालयांचीही व्यवस्थित साफसफाई नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

# खारघरमध्ये भुईमूग उत्पादनाचा प्रयोग ठरला यशस्वी

## कोकण कृषी विकास प्रतिष्ठानचा पुढाकार

**खारघर : प्रतिनिधी**

खारघरसारख्या सिमेंटच्या जंगलात कोकण कृषी विकास प्रतिष्ठानने भुईमूगाचे उच्चांकी उत्पादन घेतले आहे. प्रयोगशील शेती म्हणून कोकण कृषी विकास प्रतिष्ठान दरवर्षी विविध प्रयोग शेतीत करीत असते. या न्यासाच्या स्थापनेपासून कृषीविषयक विविध क्षेत्रात काम करून नवनवीन प्रयोग व सुधारीत वाणांची लागवड करून उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत व कृषीप्रेमीपर्यंत पोहचवण्याचे महत्त्वाचे काम केले जाते.



२०२४-२४ यावर्षी उन्हाळी हंगामात भुईमूग प्रचलित सुधारीत वाण व सुधारीत मशागत पद्धतीचा उपयोग करून प्रति २० एकर क्विंटल विक्रमी उत्पन्न मिळाले. खारघरमधील या प्रात्यक्षिक प्रयोगामध्ये भाभा परमाणू संशोधन केंद्र येथून भुईमूग पीकात संशोधन केलेले डॉ. प्रेम काळे यांच्या मार्गदर्शनात हा प्रयोग राबविण्यात आला व सहकार्य मिळाले. काळे यांनी आत्तापर्यंत भुईमूगाचे बरेच वाण विकसित केलेले असून त्यांची लागवड बहुतांश शेतकरी करीत आहेत. गेली दोन वर्षे ते कृषी विकास प्रतिष्ठान खारघर विविध संशोधनात्मक भुईमूगावर काम करीत आहेत.

कोकण कृषी विकास प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक शेखर सांवत तसेच प्रतिष्ठानचे संशोधन प्रमुख श्रीकृष्ण सांवत व पर्यवेक्षक उमेश दळवी यांच्या देखरेखेखाली प्रतिष्ठानचे विविध प्रयोग चालू आहेत. भुईमूग वाणामध्ये उत्पादन क्षमता अधिक, पक्व काळ लवकर किंवा मध्यम, दाण्याचा उतारा चांगला, शेगदाण्यामध्ये तेलाचे प्रमाण अधिक व रोगप्रतिकार क्षमता अधिक असणे महत्त्वाचे आहे.

बियाणाची शुध्द्वता म्हणजे भेसळमुक्त, बियाणे शुद्ध व उगवण क्षमता अधिक असणे महत्त्वाचे असते. उगवण कमी झाल्यास माल्यास झाडांची संख्या कमी राहते व एकूण उत्पन्न कमी मिळते. या सर्व गोष्टी विचारात घेऊन खारघर शहरातील भुईमूगाचा प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात आला आहे.

# फुलांनी बहरणार महामार्गावरील दुभाजक

**मुंबई : प्रतिनिधी**

महापालिकेच्या उद्यान विभागाने अलिकडेच शहरातील अनेक उद्यानांचा कायापालट केला आहे. रस्त्यालगतच्या झाडांच्या खोडाभोवतीही रोपटी लावून अधिक आकर्षक केला जात आहे.

याचेच पुढचे पाऊल म्हणून आता महामार्ग, मुख्य रस्त्यांवरील दुभाजक आकर्षक करण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे.

दुभाजकाच्या ठिकाणी आता तेथे वेगवेगळ्या रंगांतील फुलझाडांची लागवड केली जात आहे. त्यामुळे दुभाजकांमध्ये फुले बहरणार असून, प्रवासही आल्हाददायक होणार आहे. उद्यान विभाग सातत्याने नवनवे उपक्रम राबवत आहे.

उद्यानांमध्ये वेगळ्या प्रकारची झाडे लावली जात आहेत. जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवरील मातोश्री मीनाताई ठाकरे उद्यानामध्ये शिल्पग्राम तयार करण्यात आले आहेत.

# शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीला प्राधान्य द्यावे -आमदार भरत गोगावले

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकण्यापेक्षा आधुनिक तंत्राने शेती करण्याची मानसिकता बाळगावी, असे आवाहन शिवसेना प्रतोद आमदार भरत गोगावले यांनी केले.

श्री सिद्धीविनायक सेवा संस्था बोरावळेतर्फे गुरुवारी (दि.२३) शेतकऱ्यांना मोफत भातबियाणे वाटप करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी व्यासपिठावर माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, नायक मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सुनील मोरे, विभागप्रमुख सतीश शिंदे, कृष्णा नरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण मोरे, श्रीसिद्धीविनायकचे संचालक दत्ता मोरे, भाजप तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर, जितेंद्र जाधव, शहरप्रमुख सुरेश पवार, उद्योजक संतोष मोरे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

कृउबा समितीचे संचालक लक्ष्मण मोरे यांनी, शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न वाढविण्याची गरज असून शासनाच्या योजनांची माहिती देण्यासंदर्भात कृषी अधिकारी आणि शेतकऱ्यांचा मेळावा लवकरच आयोजित करण्याची गरज असल्याचे सांगितले. भाजप जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत यांनी, शेतकऱ्यांनी डिझेलचा खर्च करण्याची तयारी दर्शविल्यास तालुक्यातील ३० जेसीबी मालकांपैकी किमान १५ जेसीबी मालक शेतजमिनीवरील राडारोडा बाजूला करून देतील, अशी ग्वाही दिली. राजिप माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी, शेतकऱ्यांनी आता सामुदायिक शेती करण्याची मानसिकता रूजण्याची गरज असल्याचे सांगितले.

या वेळी ३०० शेतकऱ्यांना कर्जत २ भातबियाणांचे प्रत्येकी १५ किलोची पिशवी देऊन उर्वरित शेतकऱ्यांना त्यांच्या गावामध्ये भातबियाणे पोहोचविण्यात येईल, अशी ग्वाही श्री सिद्धीविनायक सेवा संस्थेमार्फत लक्ष्मण मोरे यांनी दिली.






## निवडक



### खारघर येथे बुद्धजयंती साजरी

**नवी मुंबई** : सत्याग्रह महाविद्यालय खारघर येथे पाली भाषा आणि बुद्धिझम अभ्यास विभागाच्या वतीने भगवान गौतम बुद्धजयंतीचा कार्यक्रम प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी प्राचार्या नेहा राणे यांनी वैशाखी पौर्णिमा जगभर साजरी करण्यामागची कारणे आपल्या भाषणात सांगितली, तर प्रा. सतिश पवार यांनी भगवान बुद्धांच्या विचारांचे सर्वधर्मियांत असणारे प्रतिबिंब या विषयावर अनेक उदाहरणे दिली. बुद्धांच्या विचारांचा सर्व धर्मावर झालेला प्रभाव मांडून प्रमाणपत्रधारी नव्हे तर आचारणातून सर्व धर्मातील अनुयायी बुद्ध कसे आहेत हे उलगडून सांगितले. प्रा. संगिता जोगदंड, प्राचार्या वनिता सुर्यवंशी यांनी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

### पनवेलमध्ये रिक्षाचालकाची आत्महत्या

**पनवेल** : राहत्या घरात असलेल्या किचनमधील लोखंडी पाईपाला गळफास घेवून रिक्षाचालकाने आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. जयेश यादव (३३) असे या रिक्षाचालकाचे नाव असून त्याने आपल्या राहत्या घरात असलेल्या घरातील किचनमधील लोखंडी पाईपाला अज्ञात कारणावरून गळफास लावून घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गुळसुंदे येथून दुचाकीची चोरी

**मोहोपाडा** : गुळसुंदे अकुलवाडी येथे फिर्यादी यांची दुचाकीची चोरीची घटना घडली आहे. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत गुळसुंदे अकुळवाडी कातकरीवाडी येथे फिर्यादीच्या घरासमोर पार्क केलेली एकूण ३० हजार रुपये किंमतीची केटीएम दुचाकी (एमएच ४६ बीवाय ३०८२) कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार मदन पाटील हे करीत आहेत.

# मोरा-भाऊचा धक्का रो-रोचे काम युद्धपातळीवर

## २०२५पर्यंत वाहतूक सुरू होण्याची माहिती

**उरण : प्रतिनिधी**

मोरा-भाऊचा धक्का (मुंबई) रो-रो या रखडत सुरू असलेल्या जलसेवेचे काम आता युद्धपातळीवर सुरू झाले आहे. यामुळे मार्च २०२५पर्यंत या रो-रो सेवेची प्रवासी वाहतूक सुरू होईल, अशी माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली आहे.

उरणमार्गे प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी आपल्या वाहनांसह मुंबईत ये-जा करता यावे, याकरीता मोरा ते भाऊचा धक्का (मुंबई) या जलमार्गावर रो-रो सेवा सुरू करण्यात येणार आहे. ७५ कोटी खर्चाच्या जलसेवेच्या कामाला मागील दोन वर्षांपासून सुरुवात झाली आहे, मात्र कधी स्थानिक मच्छीमारांचा विरोध तर कधी दगडखाणी बंद आणि तरी यांत्रिक बिघाड, ठेकेदार बदलणे, निधीची कमतरता आदी विविध कारणांमुळे मोरा ते भाऊचा धक्का या जलमार्गावर रो-रो सेवेचे काम संथगतीने सुरू आहे, मात्र आता पुन्हा या जलवाहतुकीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. पाच महिन्यांपूर्वी देशातील सर्वांत मोठ्या २२ किमी लांबीचा शिवडी-न्हावा अटल सेतू वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला आहे, तसेच उरण-नेरूळ मार्गावरील प्रवासी वाहतूकही जानेवारीपासून सुरू करण्यात आल्याने मुंबईत नागरिकांना दिड-दोन तासांत पोहचता येत आहे.



> मोरा ते भाऊचा धक्कादरम्यान रो-रो सेवेच्या कामातील अडथळे दूर करण्यात आले आहेत. यामुळे मार्च २०२५पर्यंत काम पूर्ण होईल. त्यानंतर या रो-रो सेवेच्या सात किमी अंतरावरील जलमार्गावर प्रवासी वाहतूक सुरू होईल.
> -सुधीर देवरे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड

मोरा ते मुंबई रो-रो सेवा सुरू करण्यात आल्यानंतर मोरा-भाऊचा धक्का या दोन्ही बंदरातून प्रवाशांना अवघ्या तासाभरात किंवा त्याहूनही कमी वेळात उरण-मुंबईच्या प्रवाशांना शक्य होणार आहे. यामुळे या रो-रो सेवेची मागील अनेक वर्षांपासून प्रवाशांना प्रतिक्षा लागून राहिली आहे, मात्र काही महिन्यांपासून बंद पडलेल्या आणि रखडत सुरू असलेल्या मोरा ते मुंबई रो-रो सेवेच्या कामामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

## सील आश्रम व नवी मुंबई पोलिसांची निराधारांसाठी बचाव मोहीम

**पनवेल : वार्ताहर**

सील आश्रम आणि नवी मुंबई पोलिसांच्या सहकार्याने १५ दिवसांच्या कालावधीसाठी परिसरात बचाव मोहीम सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचे नाव रेस्क्युनाइट २०२४ मिशन असे असून त्याद्वारे पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्त्यावर फिरणाऱ्या निराधार आणि गरजूंना वैद्यकीय मदत आणि त्यांचे पुनर्वसन करून त्यांना चांगले जीवन देण्याचे कार्य करण्यात येणार आहे.

या मिशनचे उद्घाटन नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते पनवेल तालुक्यातील वांगणी नेरे येथील सील आश्रम येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला अल्पसंख्याक आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. अब्राहम मथाई, मानवी तस्करी विरोधी युनिटचे मिलिंद वाघमारे, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील, वपोनि पृथ्वीराज घोरपडे, सील आश्रमाचे संस्थापक के. एम. फिलिप, मुख्य समन्वयक लाइजी वर्गीस (रेस्क्युनाइट ड्राइव्ह २०२४) आदी उपस्थित होते.

जर रस्त्यावर कोणी निराधार व्यक्ती दिसल्यास सील आश्रम आणि पोलिसांना तत्काळ कळवा आणि आम्हाला जनसेवेचे संधी द्या, असे आवाहन या कार्यक्रमात करण्यात आले.



## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे बारावी परीक्षेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी विज्ञान शाखेच्या परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे, तर वाणिज्य शाखेचा निकाल ९९.३३ टक्के लागला आहे. वाणिज्य आणि विज्ञान शाखा मिळून एकूण ५२ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये आले असून १५१ विद्यार्थी ग्रेड १ने उत्तीर्ण झाले आहेत.

वाणिज्य आणि विज्ञान शाखेतून एकूण २९२ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यातून २९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेतून सबा खमसे ९१.५० टक्के प्रथम, मुस्कान वालिलकर ९०.६७ टक्के द्वितीय तर मनोज पांडे या विद्यार्थ्याने ९०.५० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. वाणिज्य शाखेतून १५० विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी १४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेतून १४२ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले होते आणि सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मारीया खातून ८७ टक्के प्रथम, आदित्य यादव ८५ टक्के द्वितीय तर सादीया पटेल या विद्यार्थीनीने ८३.३३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

एचएससी बोर्ड परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरूणशेठ भगत, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्या निशा नायर यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## भरधाव रिक्षाची कंपाऊंडला धडक

### एका महिलेचा मृत्यू; दोन प्रवासी जखमी

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील हरिग्राम ते केवाळे या मार्गावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या रिक्षाचालकाने एका वॉल कंपाऊंडला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षातील तीन महिला प्रवाशांपैकी एकीचा मृत्यू झाला आहे, तर दोघीजणी जखमी झाल्या आहेत.

रिक्षाचालक हा पनवेल येथून प्रवासी भरून हरिग्राम ते केवाळेमार्गे जात असताना त्याचा रिक्षावरील ताबा सुटून त्याने वॉल कंपाऊंडला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षा प्रवासी नागूबाई भगत (५९) या गंभीररित्या जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला, तर इतर दोन प्रवासी जखमी झाले आहेत.

या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ढगाळ वातावरणामुळे उष्णतेत वाढ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे तापमानात घट होईल, अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली होती, परंतु तालुक्यातील वातावरण ढगाळ झाल्यानंतर उष्णता वाढली. त्यामुळे घामाच्या धारांनी नागरिक बेजार झाले आहेत. त्यातच अनेकदा वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवाची लाहीलाही होत असते. त्यामुळे तालुक्यातील नागरिकांना आता वरुणराजाच्या बरसण्याची आस लागली आहे.

## जेएनपीटीमध्ये भारतीय मजदूर संघाची जिल्हा बैठक

**उरण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा भारतीय मजदूर संघ बैठक बुधवारी (दि.२३)जेएनपीटी येथे संघटनेच्या कार्यालयामध्ये आयोजित केली होती. या वेळी जिल्हाध्यक्ष सुरेश पाटील, प्रदेशाध्यक्ष ॲड. अनिल डुमणे, महामंत्री किरण मिलगीर, खजिनदार बाळासाहेब कांबळे, विभाग संघटक भगवान साटम, जेएनपीटीचे कामगार नेते सुधीर घरत, जिल्हा सेक्रेटरी अशोक निकम, संघटक डी. पी. सोनावणे, जनार्दन बंडा, भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रतिनिधी नुरा शेख, जिल्हा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बैठकीपूर्वी श्रमिक गीतगायन करण्यात आले. अध्यक्ष सुरेश पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सन २०२४-२५मधील जिल्ह्याच्या बैठकांचे नियोजन करण्यात आले. भारतीय मजदूर संघाला २०२४-२५ला ७० वर्षे पूर्ण होणार असल्याने प्रदेशाने व केंद्राने दिलेल्या सूचनेनुसार भारतीय मजदूर संघाचा कार्यविस्तार व्हावा या दृष्टिने जिल्हा अधिवेशन जुलै-ऑगस्ट या दोन महिन्यात घेण्यात यावे, जिल्ह्यातील गावागावांत जाऊन भारतीय मजदूर संघाची माहिती द्यावी, असे नियोजन करण्यात आले.

४० ते ४५ वयोगटातील कार्यकर्त्यांची यादी प्रदेशकडे पाठविणे व पंधरवड्यात गावोगावी जाऊन संघाची ओळख पटवून देणे, महिला मेळावा घेणे आदी विषयांवर चर्चा करून पुढील बैठकीचे नियोजन करण्यात आले, तसेच १५ जून रोजी भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हिरण्यमय पंड्या जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यानिमित्ताने जिल्हा कामगार मेळावा रोहा येथे आयोजित करण्याचे ठरविले.

## कार आणि पैसे घेऊन गेल्याप्रकरणी चौघांविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

कार आणि पैसे घेऊन गेल्याप्रकरणी शेख साजेब आणि इतर तीन अनोळखी व्यक्तींविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

इरफान प्लास्टरवाला हे सेक्टर आर १, करंजाडे येथे राहतात. ते घरी असताना साजेब शेख यांनी ऑफिस भाड्याने पाहिजे असल्याचे सांगून कामोठे येथे बोलावले आणि पूर्वीच्या व्यवहारातील पैसे परत का करीत नाही? म्हणून त्याच्यासोबत असलेल्या तीन व्यक्तींकडून धमकावून व बळजबरीने गाडीत बसवले आणि खारघर, सीवूड्स येथे नेऊन मारहाण केली. त्याचप्रमाणे बळजबरीने व्हिडिओ काढून स्वतः च्या अकाउंटवर ७५ हजार रुपये गुगल ट्रान्सफर केले, तसेच रोख २४ हजार रुपये एटीएममधून काढून घेतले.

त्यानंतर प्लास्टर वाला यांच्याकडील चारचाकी (एमएच ४८ एके १७९०) हुंडाई क्रेटा घेऊन ते निघून गेले. त्यामुळे चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पनवेल महापालिकेतर्फे विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

**पनवेल : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महापालिकेने लोकसहभागातून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेतील विजेत्यांना गुरुवारी (दि.२२) बुद्धपर्णिमेनिमित्त आंबेडकर भवन येथे आयोजित कार्यक्रमात बक्षीस वितरण करण्यात आले.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, अनिल भगत शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, महापालिका अधिकारी अनिल कोकरे, शैलेश गायकवाड, किर्ती महाजन, नामदेव पिचड, बहुजन पंचायत समिती १चे सदस्य अनिल जाधव, महेश साळुंखे, नरेंद्र गायकवाड, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकांध्ये उपायुक्त कैलास गावडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या निबंध व वक्तृत्व स्पर्धांमध्ये महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळांनी सहभागी झाल्याबद्दल आभार मानले, तसेच पुढील वर्षी यावर्षीपेक्षा मोठ्या प्रमाणावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल, असे सांगितले.

या वेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीसाठी देणगी दिलेल्या देणगीदारांचाही सत्कार करण्यात आले, तसेच चित्ररथ, निबंध व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

**वक्तृत्व स्पर्धेतील विजेते**

१. समीक्षा वाढवणे
२. दिक्षा पाटील
३. प्रतिक पवार
४. मुदित मिश्रा
५. संदिप दिवे

**निबंध स्पर्धेतील विजेते**

१. सिमरन शर्मा
२. आर्या धनावडे
३. प्रेमनाथ पाटील
४. निहिरा चोलंगी
५. मानव पटेल




## पनवेलमधील पब्स आणि बारची झाडाझडती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुण्यातील कल्याणीनगरमध्ये घडलेल्या हिट ॲन्ड रन प्रकरणातील मद्यधुंद कारचालक अल्पवयीन असल्याचे आढळल्यानंतर पोलिसांनी अल्पवयीन मुलांना मद्य देणाऱ्या पब्स आणि बारचालक-मालकांवर कारवाईला सुरुवात केली आहे.

वाहतूक प्रतिबंधक कक्षाने अल्पवयीन मुलाला दारू विक्री करणाऱ्या सीबीडी सेक्टर-१५मधील वाईन शॉपमालकावर कारवाई केली. पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलांनी मद्यप्राशन केल्यानंतर भरधाव कार चालवून दोघांचा बळी घेतल्याचे सिद्ध झाले आहे. त्यानंतर पब्स आणि बारची झाडाझडती होत आहे.

नवी मुंबई, पनवेलमध्ये लेडीज बार आणि पबमध्ये बहुतेक अल्पवयीन मुलेमुली सहभागी होत असल्याचे यापूर्वी पोलिसांनी केलेल्या कारवाईत आढळले आहे. पब, बार तसेच हुक्का पार्लरमध्ये अल्पवयीन मुलामुलींना दारू पिण्यासाठी दिल्यास सदर आस्थापना चालकांवर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

## विजेच्या धक्क्याने म्हशीचा मृत्यू

**उरण** : विंधणे ग्रामपंचायत हद्दीत दुधाळू म्हशीच्या अंगावर विद्युतवाहक तार पडल्याची घटना गुरुवारी (दि.२३) सकाळी घडली. विजेच्या धक्का लागून म्हशीचा तडफडून मृत्यू झाला. यासंदर्भात पंचनामा केला आहे.

गोठ्याजवळ असणाऱ्या धोकादायक विद्युतवाहक तारा हटविण्यासाठी लहू भोईर यांनी महावितरणकडे मागणी केली होती, परंतु मागणीची दखल घेतली नाही. म्हशीच्या अंगावर विद्युत वाहक तार पडल्याने म्हशीने हंबरडा फोडला. लहू भोईर यांनी उर्वरित म्हशीच्या गळ्यातील दोर कापले. त्यामुळे त्या म्हशी बचावल्या आहेत.

## स्व. श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर यांना आदरांजली




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

द्रोणागिरी येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय येथे गुरुवारी (दि.२३) स्व. श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर यांना अकराव्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली.

यानिमित्त शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे, शाळेचे कमिटी मेंबर सुनील पाटील, सुरेश पाटील, तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच मुख्याध्यापिका व कमिटी मेंबर्सनी माताजींना पुष्पहार अर्पण करून आदरांजली व्यक्त केली.

शाळेचे संगीत शिक्षक रविराज कोळी यांनी भजन सादर केले. रुपाली सोनकर यांनी भावपूर्ण शब्दात माताजींना आदरांजली वाहिली.

शेवटी सुरेश पाटील यांनी माताजींच्या आठवणींना उजाळा दिला. शाळेच्या भावी वाटचालीबद्दल शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रुपाली खडकीकर यांनी केले.

## संपादकीय

# विकासयात्रेचा लाभांश!

रिझर्व्ह बँकेने बुधवारी केंद्र सरकारला २०२३-२४ आर्थिक वर्षासाठी २.११ लाख कोटी रुपयांचा लाभांश देण्यास मान्यता दिली. देशाच्या मध्यवर्ती बँकेने सरकारला दिलेला हा आजवरचा सर्वाधिक मोठा, विक्रमी लाभांश आहे. याचा थेट फायदा सरकारला वित्तीय तूट भरून काढण्यात होईल आणि पायाभूत विकासकामांचा जो सपाटा मोदी सरकारने गेली काही वर्षे लावला आहे, त्याचाही वेग वाढवण्यासाठी ही रक्कम उपयोगी पडू शकते.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली भारताची जी चौफेर विकासयात्रा सुरू आहे, त्याचा मोठा पडाव गाठण्यात बुधवारी यश आले असे म्हणावे लागेल. रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाची बुधवारी बैठक झाली, त्यात यंदाच्या वर्षासाठी केंद्र सरकारला तब्बल २.११ लाख कोटी रुपयांचा लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला. रिझर्व्ह बँक ही देशाची मध्यवर्ती बँक आहे. गुंतवणूक आणि डॉलरसारख्या महत्त्वाच्या परकीय चलनातील मूल्यांकनाचे अधिकार या सर्वोच्च संस्थेकडे असतात. त्यायोगे रिझर्व्ह बँकेकडे गंगाजळी साठत असते. रिझर्व्ह बँकेकडील चलनसाठ्यावर परिणाम करणाऱ्या घटकांमध्ये अर्थातच केंद्र सरकारची पोषक धोरणे आणि निर्णय यांचाही समावेश करावा लागेल. यापूर्वी २०१९ साली रिझर्व्ह बँकेने केंद्राला पावणेदोन लाख कोटी रुपये लाभांश जाहीर केला होता, त्यात यंदा भरीव भर पडली. शेतकरी, महिला आणि युवावर्गासाठी मोदी सरकारने अनेक कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. त्या यापुढेही तडीस नेण्यासाठीही या भल्याभक्कम रकमेचा उपयोग होणार आहे. नोव्हेंबर २०१६मध्ये पंतप्रधान मोदी यांनी नोटबंदीची घोषणा केल्यानंतर रिझर्व्ह बँकेने सावध पावले उचलली होती. त्याच्या पुढील वर्षी फक्त ३९ हजार कोटी रुपये इतकाच लाभांश केंद्र सरकारच्या पदरी पडला होता. २०१९मध्ये सरकारला सुमारे १.७६ लाख कोटींचा विक्रमी लाभांश दिला होता. गेल्या वर्षी केंद्र सरकारला ८७ हजार कोटी रुपयांच्या आसपास लाभांश मिळाला. यंदाचा आकडा मात्र चांगलाच मोठा आहे हे अर्थतज्ज्ञांनाही मान्य करावे लागेल. रिझर्व्ह बँक दरवर्षीच केंद्र सरकारला लाभांश देते, त्यात नवीन असे काही नाही, असा युक्तिवाद आता मोदीविरोधक करतीलच, पण त्यांनाही हा आकडा निरुत्तर करेल असे वाटते. रिझर्व्ह बँकेकडून केंद्राला लाभांश मिळणे हे नवीन नसले तरी दोन लाख कोटींचा आकडा ओलांडणे हे प्रगतीचे स्पष्ट द्योतक मानायला हवे. मोदी सरकारने वेळोवेळी घेतलेल्या आर्थिक निर्णयांचे हे फलित आहे. मोदी सरकारची आर्थिक धोरणे फसल्याची टीका विरोधी पक्ष सातत्याने करत असतात. त्यांना या लाभांशाच्या आकड्याने चांगली चपराक मिळाली आहे. काम न करणाऱ्या सरकारला लाभांश मिळणे शक्य होईल का? किंबहुना केंद्रीय धोरणे फसली की त्याचा परिणाम आपोआप रिझर्व्ह बँकेच्या गंगाजळीवर होत असतो. यंदाचा लाभांश हा त्या दृष्टीने आनंदाची बातमी घेऊन आला आहे. कोरोनापश्चात जगातील कित्येक मोठे देश भारताकडे आशेने पाहात आहेत. येत्या काही वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था बऱ्यापैकी भरभराटीला येईल अशी चिन्हे आहेत. भारताची विकासयात्रा योग्य मार्गावर चालली असल्यामुळेच जनतेला पुन्हा एकदा मोदी सरकार हवे आहे. येत्या काही वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा गाठेल अशी महत्वाकांक्षा आहे. हे निव्वळ स्वप्नरंजन नसून त्या दिशेने भारतीय अर्थव्यवस्था वेगाने निघाली आहे हाच या लाभांशाचा अर्थ म्हणता येईल.**

# धोकादायक इमारतीबाबत ठोस भूमिका घेणे गरजेचे





**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

रायगड जिल्हा प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार जिल्ह्यात ४९९ इमारती धोकादायक आहेत. पनवेलमध्ये सर्वाधिक २१५ धोकादायक इमारती आहेत. अलिबागमध्ये नऊ इमारती अतिधोकादायक आहेत. केवळ खासगी इमारती धोकादायक आहेत असे नाही तर शासकीय इमारतीदेखील धोकादायक आहेत. या इमारतींमध्ये काम करणारे कर्मचारी जीव मुठीत घेऊन काम करत असतात. पावसाळा सुरू झाला की धोकादायक इमारती व पुलांची चर्चा सुरू होते, परंतु ठोस उपाययोजना होत नाहीत. आजही या जिल्ह्यात अनेक पूल धोकादायक आहेत. या धोकादायक पूलांच्या दुरुस्तीबाबत तातडीने निर्णय घेणे गरजेच आहे.

आगामी पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील प्रमुख शहरांमध्ये केलेल्या सर्वेक्षण करण्यात आले आहे. यात ४९९ इमारती धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व इमारतींमधील रहिवाश्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत होण्याचे निर्देश प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींना धोकादायक इमारती आणि धरणांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानंतर पनवेल महापालिका आणि सर्व नगरपालिकांनी आपले अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर केले. या शहरांमध्ये प्राथमिक पहाणीत ४९९ इमारती धोकादायक असल्याचे दिसून आले.

यात पनवेल येथे सर्वाधिक २१५, कर्जत येथे १५४, उरण ६४, महाड ११, श्रीवर्धन ११, अलिबाग नऊ, रोहा आठ, पेण आठ, मुरूड चार, माथेरान सहा, खालापूर तीन, म्हसळा नऊ धोकादायक इमारतींचा समावेश आहे. या सर्व इमारतींमधील रहिवाश्यांना महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत अधिनियम १९६५ च्या कलम १९५ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. यानुसार इमारतींमधील रहिवाश्यांना तातडीने सुरक्षित स्थळी स्थलांतरीत होण्यास सांगण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत अधिनियम १९६५चे कलम १९५ अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतरीत होण्यास सांगण्यात आले आहे. या शहरी भागातील इमारती आहेत. ग्रामीण भागातदेखील अनेक इमारती धोकादायक आहेत. त्यांची माहिती घेतली जात नाही. याबाबत जिल्हा प्रशासनाने ग्रामपंचायतींनादेखील धोकादायक इमारतींची माहिती जमा करण्यास सांगितली पाहिजे. केवळ शहरी भागातच इमारती आहेत असे नाही तर शहरांलगतच्या गावांमध्येदेखील इमारती आहेत. त्यांची माहिती जिल्हा प्रशासनाकडे असली पाहिजे.

अनेकदा जिल्हा प्रशासने धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना इमारत खाली करण्याच्या नोटीस देते. नोटिसा देऊन रहिवाशी आपले राहत घर सोडत नाहीत. ज्या इमारती अतिधोकादायक आहेत तेथील रहिवाशांचे सक्तीने स्थलांतर करायला हवे. बरं केवळ खासगी इमारतीच धोकादायक आहेत असे नाही. शासकीय इमारतीदेखील धोकादायक आहेत. त्यामुळे शासन केवळ नोटीस बजावून गप्प न बसता ठोस भूमिका घ्यायला हवी. ज्या इमारती अतिधोकादायक आहेत त्या इमारतींमधील रहिवाशांना सक्तीने इमारत खाली करण्यास भाग पडले पाहिजे.

धोकादायक इमारतीप्रमाणे धोकादायक पुलांचादेखील प्रश्न आहे. २ ऑगस्ट २०१६ मुंबई-गोवा महामार्गावरील महाड येथील सावित्री नदीवरील ब्रिटीशकालीन पूल वाहून गेला होता. त्यानंतर मुरूड तालुक्यातील काशिदजवळील पूल अतिवृष्टीमुळे वाहून गेला. त्यावेळी जिल्ह्यातील जिर्ण आणि धोकादायक पुलांचा प्रश्न चर्चेत आला होता. दरवर्षी पावसाळा सुरू झाला की धोकादायक इमारती व जुन्या पुलांची चर्चा सुरू होते. आजही या जिल्ह्यात अनेक पूल धोकादायक आहेत. या धोकादायक पूलांच्या दुरुस्तीबाबत तातडीने निर्णय घेणे गरजेच आहे.

जिल्ह्यात असे अनेक पूल आहेत जे ब्रिटीशकालीन आहेत. काही स्वातंत्र्यनंतर बांधण्यात आले आहेत. त्यातील काही आजही धोकादायक अवस्थेत आहेत. त्यामुळे या पूलांच्या दुरुस्तीबाबत तातडीने निर्णय घेणे गरजेच आहे. हे पूल तुटल्यास त्याचा मोठा फटका रस्ते वाहतूकीवर होणार आहे. तसेच प्राण हानीदेखील होऊ शकते.

मुरूड तालुक्यातील काशिद पूल धोकादायक बनला आहे. तो पाडून तेथे नवीन पूल बांधण्यात यावा, अशी मागणी या परिसरातील लोक करत होते, मात्र बांधकाम विभागाने जुजबी उपाययोजना करण्यापलीकडे काही केले नाही. त्यामुळे हा पूल पाडला होता. आजही रायगड जिल्ह्यात काही पूल धोकादायक आहेत. त्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी होत असते. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आपल्यालाच सगळ कळत अशा तोऱ्यात शासकीय अधिकाऱ्यांनी राहू नये. जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूलांचे स्टक्चरल ऑडीट करून किमान अतिधोकादायक पूलांवरील वाहतूक पावसाळ्यात बंद करायाला हवी. ज्या ठिकाणी जुन्या पुलांना पर्यायी पूल बांधणे आवश्यक आहे, तेथे नवीन पूल बांधले पाहिजेत.



## बदलते तंत्रज्ञान

### वापरताना निष्काळजीपणा केल्यास लॅपटॉपचा होईल स्फोट

जर तुम्ही लॅपटॉप वापरत असाल तर आजची माहिती खास तुमच्यासाठी आहे. लॅपटॉप चालवताना सिस्टम काही सिग्नल देते जे समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. जर तुम्ही या सिग्नल्सकडे दुर्लक्ष केले तर तुमचा लॅपटॉप लवकर खराब होईल किंवा बॉम्बसारखा स्फोटदेखील होऊ शकतो.



लॅपटॉप वापरताना काही गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे; अन्यथा तुम्ही अडचणीत येऊ शकता. अनेक वेळा लॅपटॉप जास्त गरम होत असल्याची भीती लोकांना वाटत असते, पण तुम्ही कधी विचार केला आहे का की सिस्टममध्ये ओव्हरहाटिंगची समस्या का उद्भवते?

**लॅपटॉप ओव्हरहाटिंग समस्या**

नवीन लॅपटॉपच्या तुलनेत जुन्या सिस्टीममध्ये जास्त गरम होण्याची समस्या जास्त आहे. यामागे एकच नाही तर अनेक कारणे असू शकतात. उदाहरणार्थ, लॅपटॉपमध्ये बसवलेला कुलिंग फॅन नीट काम करत नसल्यामुळे जास्त गरम होण्याची समस्या आहे.


कुलिंग फॅनव्यतिरिक्त दुसरे कारण असू शकते की लॅपटॉपमध्ये ज्या भागातून उष्णता बाहेर येते त्या ठिकाणी धूळ साचल्यामुळे उष्णता योग्यरित्या बाहेर पडत नाही. लॅपटॉपमध्ये साचलेली धूळ दर दोन-चार दिवसांनी साफ करत राहा, लॅपटॉपमधून उष्णता नीट बाहेर पडली नाही तरीही अति तापण्याची समस्या कायम असते. चुकूनही याकडे दुर्लक्ष करू नका. जर तुम्ही याकडे दुर्लक्ष केले तर तुमच्या लॅपटॉपची बॅटरी फुटू शकते, ज्यामुळे आग लागू शकते.

**काळजी घेणे आवश्यक**

वर्क फ्रॉम होम करताना लॅपटॉप हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनतो. यामुळे लोकांना घरी बसून कार्यालयीन कामे पूर्ण करता येतात, परंतु लॅपटॉपशी संबंधित एक चूक आहे जी बहुतेक लोक करतात. बरेच लोक लॅपटॉपवर काम करताना फक्त बंद करतात. बरेच लोक ते बंद न करता स्विच ऑफ करण्याची चूक करतात. हे अजिबात करू नये.

इलेक्ट्रॉनिक उपकरण मग ते कोणतेही असो त्याचा व्यवस्थित वापर केला गेला पाहिजे. मुख्य म्हणजे त्याची वेळच्या वेळी देखभालही करणे आवश्यक आहे. नाही तर नुकसान, तर कधी कधी धोकाही संभवतो.

# पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ



**निमित्त**

जागतिक कीर्तीचे मराठी पर्यावरण शास्त्रज्ञ म्हणजे डॉ. माधव धनंजय गाडगीळ. त्यांचा जन्म २४ मे १९४२ रोजी व शालेय शिक्षण पुण्यात झाले. त्यांचे वडील धनंजयराव बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे आजीव सदस्य होते. सलीम अलींसारखे ख्यातनाम पक्षीतज्ज्ञ त्यांचे मित्र होते. जे.बी.एस. हाल्डेन हे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ गाडगीळांच्या वडिलांच्या परिचयाचे होते. त्यांचे घर पुण्यात जैवविविधता टिकवून ठेवलेल्या वेताळ टेकडीच्या परिसरात असल्याने भटकंती करणाऱ्या माधवरावांना जीवशास्त्र या विषयात रस निर्माण झाला. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय घेऊन त्यांनी पदवी मिळवली. नंतर त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, मुंबई येथून सागरी जीवविज्ञानातील पदव्युत्तर पदवी मिळवली.

माधव गाडगीळ हे पीएचडीच्या अभ्यासासाठी पुढे अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात गेले. जीवशास्त्र विषयात गणितीय प्रतिमानांचा आधार असणारा प्रबंध सादर करणारे माधवराव हार्वर्डमधील पहिलेच विद्यार्थी होते. त्यांच्या या कामाचा संदर्भ पुढे अनेक संशोधक दीर्घकाळ देत राहिले. गाडगीळांना विल्यम बॉसर्ट यांच्या मार्गदर्शनाखाली माशांच्या वर्तनाबद्दल जीवविज्ञानातील पीएचडी मिळाली. त्यांच्या संशोधनासाठी हार्वर्ड कम्प्युटिंग सेंटरने आयबीएम शिष्यवृत्ती त्यांना दिली होती.

हार्वर्ड विद्यापीठात उपयोजित गणित संशोधन अभिछात्र पदावर त्यांनी कारकीर्दीची सुरुवात केली. नंतर त्यांनी हार्वर्ड विद्यापीठात जीवशास्त्र व्याख्याता, स्टॅन्फर्ड विद्यापीठात मानवी जीवशास्त्राचे अतिथी प्राध्यापक व्याख्याता, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कलीत सन्माननीय भारतीय अमेरिकन व्याख्याता अशी पदे भूषविली.

पुढे माधव गाडगीळ भारतात परतले. त्यांनी पुण्यात दोन वर्षे महाराष्ट्र असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्समध्ये (आता आघारकर संशोधन संस्था) वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम पाहिले.

भारताबाहेरील प्रतिष्ठित विद्यापीठांत अतिथी प्राध्यापक, व्याख्याता इत्यादी पदांवर संलग्न असताना १९७३ ते २००४दरम्यान इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू हे त्यांनी आपल्या कामाचे केंद्र ठेवले. तेथे आधी सहाय्यक, सहयोगी प्राध्यापक, नंतर प्राध्यापक आणि शेवटी त्यांनी तेथेच सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस ही संस्था स्थापन केली व तिचे ते अध्यक्ष होते. या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे देशभरातील संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, धोरणकर्ते, शेतकरी, स्वयंसेवी संस्थेतील कार्यकर्ते आणि अधिकारी एकत्र येऊन काम करत. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही संस्थेने जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन उपक्रमांत जोडून घेतले. गाडगीळांच्या प्रभावामुळे संस्थेच्या पर्यावरण विषयक सर्व प्रकल्पांत प्राण्यांचे वर्तनदेखील सातत्याने अचूक आकडेवारीत नोंदण्याचे धोरण ठेवले गेले. विज्ञानात अशा संख्यात्मक नोंदींचे विश्लेषण करणे महत्त्वाचे ठरते. माणूस हादेखील जैवविविधतेतील एकात्म पर्यावरणीय घटक आहे. तो पर्यावरणातून वगळून चालणार नाही, अशी विचारसरणी गाडगीळांनी ठेवल्यामुळे जैवविविधता संरक्षण, संवर्धनात स्थानिक लोकांच्या विरोधाची धार बोथट झाली.

गाडगीळ केंद्र शासनाच्या स्वतंत्र पर्यावरण विभाग स्थापन करण्यासाठीच्या समितीचे सदस्य होते. त्यांनी त्याचा आराखडा बनवून स्वतंत्र पर्यावरण विभाग साकारला. १९८६ ते १९९० या काळात ते भारताच्या पंतप्रधानांच्या विज्ञान तंत्रज्ञान सल्लागार मंडळाचे सदस्य राहिले. जैवविविधता परिषदेच्या सल्लागार समितीचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. पंतप्रधानांच्या पुढाकाराने वाघांचे संरक्षण, व संवर्धन करण्याच्या हेतूने स्थापलेल्या विशेष कार्यगटाच्या पाच निष्णात सदस्यांपैकी ते एक होते. त्यांचे समाजोपयोगी संशोधन, मार्गदर्शन विज्ञानप्रसाराचे कार्य अथकपणे सुरू आहे.

(साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**




रसायनी : मान्सून जवळ आल्याने घाटमाथ्याखाली मेंढरं घेऊन आलेले मेंढपाळ आपल्या मायभूमीकडे निघाले आहेत.

## आरोग्य प्रहर

### दररोजच्या आहारातूनच बनवा नसा मजबूत

नसा म्हणजेच रक्तवाहिन्या संपूर्ण शरीरात आवश्यक तत्व वाहून नेण्याचे काम करतात. या वाहिन्या फुफ्फुसातून आणि पचनसंस्थेतून सर्व पेशींमध्ये ऑक्सिजन आणि पोषक द्रव्ये वाहून नेतात आणि शरीरातून कार्बन डायऑक्साइडसारखी टाकाऊ पदार्थदेखील काढून टाकतात. नसा निरोगी आणि मजबूत असणे महत्त्वाचे आहे.



नसा मजबूत करण्यासाठी काय करावे? तर न्युट्रिशनिस्ट आणि डाएटिशियन शिखा अग्रवाल शर्मा यांच्या मते, दररोज खाल्ले जाणारे काही पदार्थ तुमच्या आहारात समाविष्ट करून तुमच्या नसा निरोगी बनवू शकता आणि रक्ताभिसरण सुधारू शकता. या गोष्टी नसांमध्ये भरलेली घाण साफ करून त्यांना पुन्हा हेल्दी बनवू शकतात.

ब्लूबेरी, स्ट्रॉबेरी आणि रास्पबेरीसारख्या बेरीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि व्हिटॅमिन सी यासारखे अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात. हे अँटिऑक्सिडंट्स फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानीपासून रक्तवाहिन्यांचे संरक्षण करतात. संत्री, द्राक्ष आणि लिंबू यांसारखी लिंबूवर्गीय फळे व्हिटॅमिन सीचे उत्कृष्ट स्रोत आहेत. कोलेजन तयार करण्यासाठी आणि रक्तवाहिन्या लवचिक ठेवण्यासाठी व्हिटॅमिन सी आवश्यक आहे. पालक, केल, स्विस चार्ड आणि इतर हिरव्या पालेभाज्यांमध्ये व्हिटॅमिन के भरपूर प्रमाणात असते. व्हिटॅमिन के रक्त गोठण्याची प्रक्रिया थांबवते आणि रक्तवाहिन्यांमध्ये कॅल्शियम जमा होण्यास प्रतिबंध करते.

सॅल्मन, मॅकेरल, सार्डिन आणि ट्राउटमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असतात. यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात आणि रक्तवाहिन्यांमध्ये प्लेक जमा होण्याचा धोका कमी होतो. अक्रोड, बदाम, अंबाडी आणि चिया सीड्स हे निरोगी फॅट, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्सचे चांगले स्रोत आहेत. हे हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन देतात आणि रक्तवाहिन्यांचे कार्य सुधारतात.

ओट्स, क्विनोआ, ब्राऊन राईस आणि गहू यांसारख्या संपूर्ण धान्यांमध्ये फायबर, मॅग्नेशियम आणि इतर पोषक घटक असतात जे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि रक्तवाहिन्या निरोगी ठेवण्यास मदत करतात. टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात लाइकोपीन असते, जे एक अँटिऑक्सिडेंट आहे. हे जळजळ कमी करण्यास आणि रक्तवाहिन्या कडक होण्यास प्रतिबंध करण्यास मदत करू शकते. त्याचप्रमाणे, लसणामध्ये सल्फर संयुगे असतात जी रक्त परिसंचरण सुधारण्यासाठी, रक्तदाब कमी करण्यासाठी आणि रक्तवाहिन्या कडक होण्याचा धोका कमी करण्यासाठी उपयुक्त असल्याचे सिद्ध झाले आहे. याशिवाय डार्क चॉकलेट आणि बीटरूटही फायदेशीर आहेत.

# पेणच्या सोनखार विभागातील शेती बहरणार

## भाजप नेते वैकुंठ पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील सोनखार गावातील तब्बल ७०० ते ७५० एकर शेती सुजलाम सुफलाम होणार होणार आहे. या कामी भाजपचे युवा नेते जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांचे प्रयत्न यशस्वी ठरले आहेत.

सोनखार गावातील खाडीमधील खैसातील गाळणी भरली असल्यामुळे सोनखार विभागातील सोनखार, काळेश्री, कलवे, उरनोली गावात ७०० ते ७५० एकर भातशेती पावसाच्या पाण्यामुळे खराब होत होती. याची दखल घेत शेतकऱ्यांनी सोनखार गावातील खाडीमधील खैसातील गाळ काढण्यासाठी भाजपचे वैकुंठ पाटील यांच्याशी यासंदर्भात संपर्क साधून विभागातील शेतकऱ्यांनी चर्चा केल्यानंतर पावसाळा तोंडावर आल्याने तातडीने या गावात जाऊन त्याची पाहणी केली व शासनाच्या कोणत्याही निधीची वाट न पाहता त्यांनी स्वतः तातडीने गाळ काढण्यासाठी जेसीबी व कामगार आणून गाळ उपासण्यास सुरुवात केली आहे.



या वेळी सहकार विभागातील सर्व शेतकऱ्यांनी स्वतःहून लोकवर्गणी काढून त्यांना हातभार लावला आले आहे. सोनखार, कालेश्री, कळवे, गावातील ग्रामस्थ शेतकरी महिला वर्ग उपस्थित होता. या वेळी वैकुंठ पाटील यांचे त्यांनी आभार मानले.

वैकुंठ पाटील यांनी शेतकऱ्यांशी बोलताना सांगितले की, ७५० एकर शेतीमधून जे पीक येणार आहे त्याचे मला समाधान आहे. आज खऱ्या अर्थाने सोनखार भागातील गावे सुजलाम सुफलाम झाल्यामुळे इथला माझा शेतकरी समृद्ध होणार आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. सोनखार गावांमधून जाणाऱ्या खाडीच्या खैसतील (नाला)मधून प्रचंड साठल्यामुळे या गावाच्या शेतजमिनी मधून पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे ७५० एकर शेतीचे नुकसान होत होते.

शासनाच्या मदतीची वाट न पाहता माझ्याकडून व आपण काढलेल्या लोक वर्गणी मधून खर्च देऊन संपूर्ण गाळ काढणार असून त्यामुळे यावर्षी ७०० ते ७५० एकर जमिनी सुजलाम सुफलाम होणार असल्याचे त्यांनी वैकुंठ पाटील यांनी पत्रकारांना सांगितले.

# पोल्ट्री खाद्य पुरवणाऱ्या कंपनीची फसवणूक

**खोपोली :** पोल्ट्री खाद्य पुरवणाऱ्या कंपनीची फसवणूक झाल्याची घटना खालापूरातील उंबरे येथे घडली आहे.

अरविंद पोल्ट्री फार्मकरीता ८ एप्रिल ते २० मेदरम्यान सहा हजार ६५० पिल्ले व ५० किलो वजनाच्या एकूण ५१० खाद्य बॅगा प्रीमियम चीकस फीड प्रा.ली. खोपोली या कंपनीकडून करारानुसार कोंबड्यांच्या पालनकरीता दिल्या होत्या. यात ५५० कोंबड्यांच्या खाद्यांच्या बॅगा न वापरता त्यापैकी ३१ बॅगा परस्पर बाहेर विक्री करून कंपनीचा ६५ हजार १०० रुपये रकमेचा अपहार करण्यात आला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE, KHARGHAR**

।। विद्या विनयेन शोभते ।।

Plot no-1, Sector-33, Kharghar, Navi Mumbai – 410210

ISO 9001:2015 & 14001:2015 Certified | Affiliated to University of Mumbai

**ADMISSIONS OPEN FOR AY: 2024-25**

**( WITHOUT CET )**

**Programs Offered (As Per NEP 2020):**

**Commerce Faculty:**

| Program Offered | Intake Capacity (F.Y.) |
|---|---|
| • B. Com. | 240 |
| • B. Com. (Acc. & Fin.) | 120 |
| • B. Com. (Management Studies) (Previously B.M.S.) | 120 |

**Science Faculty:**

| Program Offered | Intake Capacity (F.Y.) |
|---|---|
| • B. Sc. | 120 |
| • B. Sc. (Info. Technology) | 60 |
| • B. Sc. (Computer Science) | 60 |

**About the College:**

- Highly Qualified & Dedicated Faculties
- Well Equipped Science & Computer Laboratories
- CA Foundation, IBPS, Tally Coaching
- Campus Powered by Google Workspace
- Excellent Infrastructural Facilities
- Local Chapter of NPTEL on SWAYAM Platform
- Placement Assistance & Career Guidance
- Sports Ground

**Direct Admissions for Girl Students**

**Admissions Started!! Call Now:**

**9773012732 | 7303601555 | 9359944107 | 9521967877**

Email ID: principal@rtccs.edu.in Website: rtccs.edu.in


# दोन दुचाकींची समोरासमोर घडक

## तीन पोलीस कर्मचारी जखमी

**धाटाव : प्रतिनिधी**

दारूच्या नशेत तर्रर होऊन भरधाव वेगाने दुचाकी चालवीणाऱ्या एका पोलीस कर्मचाऱ्याने समोरून येणाऱ्या दुसऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. त्यात एकाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला तातडीने मुंबईत हलविण्यात आला आहे.



रोहा पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी शरद काशिनाथ कोटकर व याकूब तडवी हे दोघे बुधवारी रात्रीच्या दरम्यान सागर कवच अभियान अंतर्गत सरकारी मोटरसायकल (एमएम ०६ सीएफ ९६३४) वरून गोफण परिसरात गस्त घालत असताना रात्री ८.५०च्या सुमारास समोरून नागोठणे पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी दयानंद गोविंद ठाकूर हे दारूच्या नशेत चुकीच्या साईडला भरधाव वेगाने येऊन आपल्या ताब्यातील सीबी युनिकॉर्न या मोटरसायकल (एमएच ०६ बीएस ३७७५) समोरून आलेल्या सरकारी मोटरसायकलला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात घडला.

या अपघातात पोलीस कर्मचारी तडवी यांना जबर मार बसल्याने त्यांना तातडीने मुंबईत हलविण्यात आले आहे. तर शरद कोटकर व दयानंद ठाकूर यांना रोह्यातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दारूच्या नशेत चुकीच्या साईडला येऊन वाहन चालवून अपघातास कारणीभूत ठरलेल्या पोलीस कर्मचाऱ्याविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स. पो. निरीक्षक संदीप ऐदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उप निरीक्षक मनिष हिरवरकर पुढील तपास करीत आहेत.

## कर्जत रेल्वेस्थानकातील पंखे बंद असल्याने प्रवासी नाराज

**चौक :** कर्जत रेल्वेस्थानकातील पंखे बंद असुन या उन्हाळ्यात प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. संपूर्ण तीनही प्लॅटफॉर्म वरील पंखे बंद असल्याचे चित्र आहे.



कर्जत रेल्वे स्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्या थांबत असतात. तर कर्जत ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कर्जत अशाही गाड्या धावतात. त्यामुळे याठिकाणी अनेक रेल्वे प्रवाशी या रेल्वे स्टेशनवर येतात.

कुर्ला, दादर येथे उतरून मार्गस्थ होता येते, त्यामुळे येथे प्रवाशी वर्दळ वाढली आहे. सद्ध्या उष्णतेची लाट सुरू आहे, अंगाची लाहीलाही होत आहे, आणि अशातच रेल्वे प्रवाशांना एकमेव आधार असलेले रेल्वे स्टेशनवरील पंखे शांत असल्याचे चित्र दिसून आले आहे. त्यामुळे अनेक प्रवासी आपली नाराजी व्यक्त करीत आहेत.

# रोह्यात अवैध माती उत्खनन; कारवाईची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात पुन्हा एकदा अवैध धंद्यांना ऊत आले आहे. अवैध माती, दगड मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येत आहे. मुख्यतः रोहा ते बारशेत रस्तालगत बारशेत हद्दीत रात्री माती उत्खनन मोठ्या प्रमाणावर चालू आहे. माती माफिया डंपरच्या सहाय्याने रॉयल्टी न भरता माती उत्खनन मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. परिणामी शासनाचा महसूल बुडाला आहे. अशा सराईत माती माफियाविरोधात प्रशासनाने ठोस कारवाई केली पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



दरम्यान, अशा विनापरवाना माती उत्खननात व डोंगरफोडीमुळे पर्यावरण प्रेमीने चिंता व्यक्त केली असुन डोंगर भागाची कडा कोसळु शकते. माती, मुरूम विक्रीचा व्यवसाय जोरात सुरू आहे. याकडे महसूल प्रशासन व संबंधित विभागाने गांभिर्याने दखल घेऊन माती माफियार कारवाई करण्याची मागणी सामान्य नागरिकांनी केलेली आहे.

**मी शनिवारी म्हसाडी येथुन रात्री बाईकवर येत होतो. तेव्हा तीन डंपर व एक जेसीबी मशीनच्या सहाय्याने मुरुम माती भरली जात असल्याचे दिसले. मी थांबतोच तोपर्यंत समोरून आवाज आला चल रे पुढे इथे थांबु नको त्यामुळे भीतीपोटी मी निघून आलो.**
**–अविनाश भगत,**
**सामाजिक कार्यकर्ते, रोहा**

**जेथे माती उत्खनन केली जात आहे त्या जागांची मालकांनी रॉयल्टी का काढली नाही, याचा तपास करून अशा अवैध माती उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल तसेच ज्या शेतकऱ्यांची जागा आहे त्या जागेवर अतिरिक्त बोजा चढविला जाईल.**
**–मंगेश साळवी, तलाठी, बारशेत सजा**

# खोपोली रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याची दुरवस्था; प्रवासी नाराज

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याची गेल्या एक वर्षांपासून अशरशः चाळण झाली आहे. या रस्त्याची रेल्वे प्रशासनाचे डागडुजी करावी, अशी मागणी संतप्त प्रवासी करीत आहेत.

खोपोली रेल्वे स्थानक ब्रिटिशकालीन असून हे मध्य रेल्वेचे महत्वाचे स्थानक मानले जाते. खोपोली ते सीएसटीपर्यंत थेट लोकल ट्रेन असल्याने हजारो प्रवासी या मार्गावरून दररोज प्रवास करतात. यामध्ये बाहेर गावावरुन ये–जा करणारे प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विविध कारखान्यात जाणारे कामगार, शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, गगनगिरी मठ तसेच इमॅजिका, लोणावळा, खंडाळा जवळ असल्याने या स्थानकावरून पर्यटक व प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते.



गेल्या वर्षापासून रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने या रस्त्यावरून प्रवाशांना आपला जीव धोक्यात टाकून प्रवास करावा लागतो. यामुळे रिक्षा व अन्य ये–जा चालणाऱ्या वाहन चालकांसह प्रवाशांमध्ये मोठी कसरत करावी लागते. स्थानिक प्रशासनाचे अंतर्गत रस्ते व प्रवाशांच्या सेवा–सुविधांकडे लक्ष देण्याची मागणी प्रवाश्यांकडून होत आहे. पावसाळ्या पूर्वी या अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व डागडूजी करण्याची मागणी केली जात आहे.

# म्हसळ्यात कुटुंब कल्याण शस्त्रक्रियांना सुरुवात

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुका कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तालुक्यांतील म्हसळा, मेंदडी, खामगाव,आंबेत ही प्राथमिक आरोग्य केंद्र आणि त्यांच्या अंतर्गत येणारी नऊ उपकेंद्र यांनी तालुक्याचे कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी एक कृतीशिल कार्यक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. यानुसार म्हसळा ग्रामीण रुग्णालयांत मंगळवारी झालेल्या शिबिरांमध्ये तालुक्यातून एकूण २१ शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. महेश मेहता यांनी सांगितले.

यामध्ये प्रा. आ. केंद्र खामगाव आठ, म्हसळा सात, मेंदडी सहा शस्त्रक्रिया झाल्याचे सांगण्यात आले. यामध्ये बहुतांश लाभार्थी आदिवासी आसल्याचे समजते. यासाठी जिल्हा रुग्णालये डॉ. विजय गवळी यांचे विशेष सहकार्य लाभले त्यांना डॉ. महेश मेहता, डॉ.प्रशांत गायकवाड, डॉ. गितांजली हंबीर, डॉ. श्रद्धा पाटील, डॉ. भावना अर्बन, डॉ. गिरीश काळे, डॉ. प्रफुल्ल एकाडे यांनी सहकार्य केले. आज झालेले कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर तब्बल २२ वर्षांनी झाल्याचे आरोग्य सूत्रांनी सांगितले. भविष्यात तालुक्याचे कुटुंब कल्याण शस्त्रक्रियांचे उद्दीष्टपूर्ती नुसार कॅंपचे आयोजन करण्यात येणार आहे. आशा सेविका, एकात्मिक बालविकास प्रकल्पच्या सेविका–मदतनीस आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आसल्याचे डॉ. मेहता यांनी सांगितले.



# मजगावमध्ये विनामूल्य संस्कार शिबिर



**मुरुड : प्रतिनिधी**

श्रीगुरू सावर्डेकर महाराज संस्थापित रूद्रेवा सेवा प्रतिष्ठान अंतर्गत श्रीगुरूमाता सेवाश्रम आयोजित विनामूल्य संस्कार शिबिर श्रीदत्त मंदिर मजगाव येथे तीन दिवसांचे शिबिर झाले. या शिबिरामध्ये मुरूड तालुक्यातील विविध भागातील १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

आदर्श व संस्कारक्षम समाज निर्माण होण्यासाठी मे महिन्याच्या सुट्टीमध्ये दरवर्षी या शिबिराचे आयोजन करण्यात येते. या शिबीरामध्ये योगासने, ध्यान, भजन, मृदंग, गायन, नृत्य, शिवकालीन शस्त्र प्रशिक्षणासह व्यक्तीमत्व विकास इत्यादी विविध विषयावर प्रशिक्षण दिले. संस्कार शिबिर समाजातील उदार, दानशूर व्यक्तींच्या व सेवाश्रम परिवाराच्या नियोजनाने आनंदाने झाले. नांदगाव ग्रामपंचायत माजी सरपंच भाई सुर्वे यांनीही मदतीचा हातभार लावून अन्नदानाचे कार्य केले.


सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील (नैना) गावांमध्ये उभारण्यात आलेले बेकायदेशीर व अनधिकृत जाहिरात फलक (होर्डिंग्ज) काढून टाकणेबाबत.**

सदर जाहीर सूचनेद्वारे सर्व जनतेस / जाहीरात फलकधारक/ जमीनमालक /जाहीरातदार यांना सूचित करण्यात येत आहे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) साठी शासन अधिसूचना क्र. टीपीएस - १७१२/४७५/ प्र.क्र. -९८/१२/नवि -१२ दि. १३/०१/२०१३ अन्वये सिडको महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सदर क्षेत्रामध्ये खालील गावांचा समावेश आहे.

**पनवेल तालुका :-**

१. आदई २. शिल्लोत्तर रायचुर ३. आकुर्ली ४. नेवाळी ५. भोकारपाडा ६. बोनशेत ७. कोप्रोली ८. हरिग्राम ९. वाकडी १०. विचुंबे ११.उसर्ली खुर्द १२. देवद १३. पालीदेवद १४. शिवकर १५. मोहो १६. विहिघर १७. नेरे १८. कोरल १९. केवाळे २०. खानाव २१. चिंचवली तर्फे वाजे २२. पाले बुद्रूक २३. वलप २४. हेदूटणे २५. कानपोली २६. चिंध्रण २७. महालुंगी २८. खेरणे खुर्द २९. अंबिवली ३०. वांगणी तर्फे वाजे ३१. चिखले ३२. पालीखुर्द ३३. लोणीवली ३४. वारदोली ३५. भेरले ३६. भिंगार ३७. लाडीवली ३८. नितळस ३९. निताळे ४०. वावंजे ४१. महोदर ४२. चिंचवली तर्फे तलोजे ४३. आंबे तर्फे तळोजे ४४. शिरवली ४५. कोंडप ४६. वांगणी तर्फे तळोजे ४७. मोर्बे ४८. भिंगारवाडी ४९. मोहोपे ५०. पोयंजे ५१. पाली बुद्रक ५२. बेलवली ५३. सांगडे ५४. बोर्ले ५५. कोन ५६. आपटे ५७. कोंडले ५८. खैरवाडी ५९. रिटघर ६०. उसर्ली बुद्रूक ६१. उमरोली ६२. दुंदरे ६३. शिवणसई ६४. तामसई ६५. आंबे तर्फे वाजे ६६. धामणी ६७. कोलखे ६८. डेरवली ६९. पळस्पे ७०. कुडावे ७१. नांदगांव ७२. वडवली ७३. तुरमाळे ७४. चिरवत ७५. देहरंग ७६. मालडुंगे ७७. धोधनी ७८. गाढे ७९. वाजे ८०. चेरवली ८१. सांगुर्ली ८२. शिरढोण ८३. चिंचवण ८४. कल्हे ८५. मोसारे ८६. नानोशी ८७. पाटणोली ८८. तुराडे ८९. वावेघर ९०. गुलसुंदे ९१. आकूलवाडी ९२. चिपळे

**उरण तालुका :-** ९३.पोही ९४.रानसई

सदर अधिसुचनेच्या दिनांकापासून म्हणजेच दि. १३/०१/२०१३ पासून नैना क्षेत्रातील कोणत्याही प्रकारच्या बांधकामासाठी / विकासासाठी (गावठाण क्षेत्रासह) परवानगी देण्याचे अधिकार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोस (बांधकाम परवानगी विभाग (नैना) सिडको यांना) आहेत. अन्य कोणत्याही प्राधिकरणांस बांधकाम / विकास परवानगी देण्याचे अधिकार नाहीत.

उपरोक्त ९४ गावांमध्ये अनेक ठिकाणी छोटी / मोठी अनधिकृत जाहिरात फलक (होर्डिंग्ज) असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर जाहिरात फलकांना सिडकोतर्फे कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. सबब सदर सर्व जाहीरात फलक (होर्डींग्ज) हे बेकायदेशीर व अनधिकृत आहेत.

नुकतेच घाटकोपर मुंबई येथे पाऊस आणि वादळ यामुळे दिनांक १३/०५/२०२४ रोजी होर्डींग कोसळून झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा दुर्देवी मुत्यू व ७४ जण जखमी झाले असून मोठी जिवित व वित्त हानी झालेली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून मोठ्या उंचीच्या या जाहीरात फलकां (होर्डींग्ज) मुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर जाहिरात फलक (होर्डींग्ज) धारक/जमिनमालक व जाहिरातकर्ते कंपन्या/व्यक्ती /संस्था यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, नैना अधिसूचित क्षेत्रातील वर नमूद केलेल्या ९४ गावांमधील बेकायदेशीर व अनधिकृत जाहिरात फलक (होर्डींग्ज) त्वरीत काढुन टाकावेत अन्यथा आपणावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल तसेच सदर जाहिरात फलक (होर्डींग्ज) कोसळुन जिवित किंवा वित्त हानी झाल्यास वा कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास आपणास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येवून आपणावर गुन्हे दाखल करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक:- २४.०५.२०२४

ठिकाण:- नवी मुंबई

**मुख्य नियंत्रक, (अनधिकृत बांधकामे)**
**नैना, सिडको**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/०२७/२०२४-२५

# खंडित वीजपुरवठ्याने नागरिक हैराण

## वाशी सेक्टर २६ मधील १८ तास बत्ती गुल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

संध्या सर्वत्र तापमानात विक्रमी वाढ होत असल्याने उकाड्याने नागरिक हैराण होत आहेत. त्यात वाशी सेक्टर २६ येथे तब्बल १८ तास वीजपुरवठा खंडित झाला होता. बुधवारी (दि. २३) रात्री ९ वाजता वीजपुरवठा खंडित झाला तो गुरुवारी (दि.२३) दुपारी पावणे तीनच्या सुमारास सुरू करण्यात आला. मागील काही दिवसांपासून सेक्टर २६मध्ये बत्ती गुल होण्याचे प्रमाण वाढले असून दिवसातून किमान तीन ते चार वेळा विद्युतपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

याबाबत स्थानिक रहिवाशांनी महावितरणला जाब विचारला असता विजेची मागणी वाढल्याने केबल तुटणे, ती नादुरुस्त होणे, केबल स्फोट झाल्याची कारणे सांगण्यात येत आहेत. वीजपुरवठा खंडित होण्याच्या वाढत्या प्रमाणामुळे रहिवाशांना वाढत्या उकड्याचा त्रास सहन करावा लागतो आहे. बुधवारी रात्री ९ च्या सुमारास बत्ती गुल झाल्याने रहिवाश्यांना रात्रभर



जागरण करावे लागले. एकीकडे उकाडा तर दुसरीकडे डासांची भुणभुण सुरु असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. लाईट नसल्याने त्याचा परिणाम अनेक कामांवर होतो. वीज नसल्याने पाणी सोडले जात नाही.

घणसोली गावात ही काही दिवसांपूर्वी बहुतांश ठिकाणी २० तास तर याआधी ऐरोली येथे १० तास वीज खंडित झाला होता. महावितरणाच्या या कारभाराचे दर्शन गेल्या काही दिवसात सातत्याने होत असून याचा सर्वाधिक फटका घणसोली आणि ऐरोली भागाला बसत असताना आता तर वाशी सेक्टर २६ मधील नागरिकांना बसू लागला आहे.

*महावितरणाकडून पावसाळ्याआधी शहरातील विजेच्या केबल्स, डीपी बॉक्ससह आधीच्या कामाची दुरुस्ती करावी. जेणेकरून पावसाळ्यात हा त्रास नागरिकांना होणार नाही.*

**–दिनेश गोरे,** *रहिवाशी*

*वाशीतील संबंधित ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला आहे की नाही याची माहिती कार्यकारी अभियंता यांच्याकडून घेऊन पुढील कारवाई करण्यात येईल. त्यानुसा विजवाहिन्यांची तपासणी होईल.*

**–ममता पांडे,** *मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण,*

*मागील काही दिवसांन पासून विजेचा खेळ सुरू झाला आहे. एकदा वीज गेली की ती तीन ते चार तासांनीच सुरळीत होते. सध्या उन्हाळा प्रचंड वाढल्याने उष्णताही वाढली आहे. वीज नसल्याने रात्रभर उकाडा सहन करावा लागतो.*

**–विलास मोरे,** रहिवाशी

*रात्री बत्ती गुल झालेली दुसऱ्या दिवशी तब्ब्ल १८ तासांनी सुरळीत झाली. याबाबत महावितरणाकडे वारंवार तक्रारीदेखील करण्यात आल्या आहेत. पुन्हा वीजपुरवठा खंडित झाल्यास वाशी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल.*

**–थॉमस चिरकुनुर,** रहिवाशी

जुनाट सिडकोकालीन वीज वाहिन्या या कमकुवत झालेल्या आहेत. २५ ते ३५ वर्षे जुन्या वीजवाहिन्या त्यात अनेकदा रस्ते खोदणे, सिमेंट काँक्रीटीकरण, डांबरीकरण होत असल्याने केबल्सची अवस्था आणखी खराब होते. त्यामुळे या केबल्स जादा विजेचा भार सहन करू शकत नाहीत आणि ठिकठिकाणी छोटे छोटे स्फोट होऊन केबल जळते. अशा ठिकाणची अनेक वर्षांपासून तात्पुरती दुरुस्ती होत असल्याने आता केबल्स जादाचा वीज भार सहन करू शकत नाहीत.

# भाताण बोगद्याजवळ एसटी बसची कंटेनरला जोरात धडक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी रिस गावच्या हद्दीमध्ये मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवेवर इचलकरंजी–मुंबई सेंट्रल या एसटी बस (एमएच ०९ एफएन ७४४०)ने भाताण बोगद्याच्या अलिकडे जात असलेल्या कंटेनर (एमएच ४६ बीएम ७०८७)ला पाठीमागून ठोकर मारली.

या अपघातामध्ये बसचालक व बसमधील प्रवासी यांना लहान–मोठ्या गंभीर दुखापती झाल्या असून दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

याबाबत पोलीस हवालदार सचिन काशिनाथ चोरे यांनी या ठिकाणी भेट देऊन अपघात झालेल्या वाहनांची माहिती घेतली असून आरोपी रोहित राजाराम कांबळे (वय ३२, रा. भादोली, ता. हातकंगले) याच्यावर रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंदाजे १५ जणांना या अपघातात लहान–मोठ्या दुखापती झाल्या असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर अधिक तपास करीत आहेत.

# नवी मुंबईत शिक्षकांच्या गणवेशासाठी मतदान


**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शासनाच्या १५ मार्चच्या शिक्षकांच्या गणवेशाबाबतच्या परिपत्रकानुसार नवी मुंबईतही शिक्षकांचा गणवेश निश्चित करण्यासाठी ऑनलाईन लिंक पाठवून शिक्षकांच्या मतदानाचा कौल घेतला जाणार आहे. त्याची सुरुवात नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने केली असून ४६० शिक्षकांनी लिंकद्वारे गणवेशाबाबत मतदानाचा कौल दिला आहे.

शिक्षकांचा संबंध हा भावी पिढीशी येत असून त्यांच्या गणवेशाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम करीत असताना शिक्षकांनी वेशभूषेबाबत जागरूक राहून आपली वेशभूषा ही आपल्या पदास अनुरूप असावी असे पत्रकात म्हटले आहे. यासोबतच विद्यार्थी हे अनुकरणप्रिय असल्याने शिक्षक व शिक्षिकांना गणवेशाबाबत योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षकांच्या गणवेशाची बाब विचारात घेता गणवेश कसा असावा त्याचा रंग कसा असावा याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

*राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने दिलेल्या मार्च महिन्यातील परिपत्रकानुसार नवी मुंबई महापालिकेतील शिक्षकांच्या गणवेशाबाबत लिंकद्वारे मतदानाचा कौल घेण्यात येत असून याबाबत शिक्षकांना िनवी मुंबईतही शिक्षकांच्या गणवेशासाठी मतदान नवी मुंबईतही शिक्षकांच्या गणवेशासाठी मतदान लक पाठवण्यात आली असून त्याद्वारे अंतिम रंगनिश्चिती करण्यात येणार आहे. सर्व शिक्षकांना लिंक पाठवण्यात आली असून आतापर्यंत ४६० शिक्षकांनी लिंक पाठवली आहे.*

**–अरुणा यादव,** शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महापालिका



नवी मुंबई महापालिकेनेही आपल्या अखत्यारीत येणाऱ्या पालिकेच्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचा गणवेश निश्चित केल्याप्रमाणे त्याचा रंगनिश्चितीसाठी लिंकद्वारे मतदानाचा कौल घेतला जात आहे. त्यात महिला शिक्षकांनी साडी अथवा सलवार, चुडीदार, कुर्ता व दुपट्टा तर पुरुष शिक्षकांनी जीन्स, टी शर्ट न वापरता पॅन्ट–शर्ट असा पेहराव करावा तसेच चित्र–विचित्र नक्षीदार कपडे परिधान करून नयेत, असे शिक्षण विभागाच्या आदेशात म्हटले आहे. शिक्षकांनी कोणत्या रंगाचा पेहराव करावा हे त्या शाळेने निश्चित करावे, असे सांगितले आहे.

नवी मुंबई महापालिकेतील शिक्षण विभागाने महिला शिक्षकांसाठीची साडी व कुर्ती तसेच पुरुष शिक्षकांच्या शर्टचा रंग निश्चित करण्यासाठी मतदान घेण्यासाठी संबंधित शिक्षकांना लिंक पाठवली आहे. त्यानुसार लिंकद्वारे साडी किंवा कुर्ती आणि शर्ट यांचा रंग निश्चित झाल्यावर त्या आधारे स्त्री शिक्षकांसाठीचा ब्लाऊज व सलवार तसेच पुरुष शिक्षकांच्या पॅन्टचा रंग निश्चित करण्यासाठी मतदान घेण्यात येणार आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेतील सर्व शिक्षकांच्या मोबाइलवर फॉर्मची लिंक पाठवण्यात आली असून हा फॉर्म तात्काळ भरून देण्याचे आवाहन देण्यात आले आहे.



# उलवे नोडमध्ये भागुबाई चांगु ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्व. श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ झाला.

या कार्यक्रमाला इंटकचे अध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य वसंत पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम हरी घरत ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन भार्गव ठाकूर, रामदास ठाकूर, शुभांगी महेंद्र घरत, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, रघुनाथ देशमुख, श्रीकांत घरत, मुख्याध्यापिका कोळी मॅडम, इन्चार्ज प्रिन्सिपल प्रणिता गोळे, मुख्याध्यापक महेंद्र काटकर, पर्यवेक्षक अरुण जोशी आदींसह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये सायन्स विभागात प्रथम आलेली नायला कुंडलिक, द्वितीय फैजल सागवेकर आणि तृतीय तनिश म्हात्रे या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

# सीवूडसच्या करावे गावातील उद्यानात कचऱ्याचे साम्राज्य; स्वच्छतेची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिवूडस करावे गाव येथे असलेले तांडेल मैदान हे सातत्याने विविध कार्यक्रमांसाठी वापरले जाते. मुख्य म्हणजे हे मैदान ठिकाणी क्रिकेट खेळण्यासाठीदेखील प्रसिद्ध आहे. या मैदानात तत्कालीन आयुक्त अभिजित बांगर यांनी मीयावाकी प्रकल्प उभारला होता. मैदानात आयताकृती आकारात या भागात साडेचार हजार देशी रोपे लावली होती. त्यांचे आता वृक्षात रूपांतर झाले आहे. त्यामुळे या रखरखीत मैदानात वृक्षांच्या रांगा दिसत आहे. मियावाकी प्रकल्पाला या मैदानात साजऱ्या होणाऱ्या सोहळ्याचे ग्रहण लागले आहे.

सोहळ्यांमध्ये आयोजीत कार्यक्रमांनंतर या झाडांमध्ये कचरा पसरला जात आहे. स्वच्छ सर्वे क्षणाला गालबोट लागत असून, कार्यक्रमाला परवानगी देताना डेकोरेटर्स व केटरर्स यांना परिसर अस्वच्छ केल्यास दंड ठोठवण्याची मागणी वाढू लागली आहे.

क्रिकेट खेळण्यासाठी येणाऱ्या खेळाडूंना त्रास होऊ नये यासाठी पालिकेने या मैदानात जळीचे कुंपण उभारून दोन भाग केले आहेत. यात एक भागात कायमस्वरुपी खेळांचे मैदान तर दुसऱ्या भागात सोहळे, लग्नसमारंभ, विविध कार्यक्रम घेण्यासाठी जागा राखीव ठेवण्यात आली आहे. पामबीच मार्गावरून काही अंतरावर असल्याने या मैदानात लग्न सोहळ्यासाठी हे मैदान प्रसिद्ध आहे. या मैदानात मोठमोठे सेट लावून लग्नसोहळे तसेच इतर संस्कृतिक कार्यक्रम होत असतात, मात्र कार्यक्रम झाल्यावर मात्र हा मैदानाचा परिसर काही दिवस गलिच्छ झालेला असतो. काही दिवसांनंतर या परिसराची स्वच्छता पालिकेचे स्वच्छता मित्र करतात. डेकोरेटर्स सामान, सुमान आवरताना सर्वाधिक कचरा होत असतो. सजावट केलेल्या अनेक गोष्टी या मैदानात पडून असतात. याबाबत सातत्याने नागरीक



नाराजी व्यक्त करत आहेत. स्वच्छता मित्र कही दिवसांनी हा कचरा उचलतात, मात्र आयोजकांनी केलेला कचरा पालिकेच्या स्वच्छता कामगारांनी का उचलावा असा देखील प्रश्न नागरीक करत आहेत.

पालिकेने मैदान भाडेतत्वावर देताना मैदान स्वच्छ करून घेऊन मगच डीपोजट संबंधितांना परत करावे, अथवा स्वच्छ शहराची शिस्त बिघडवणात्यांना दंड ठोठवावा अशी मागणी वाढू लागली आहे.

**मियावाकीतील झाडांचे नुकसान**

नवी मुंबई पालिकेने तयार केलेल्या मियावाकी प्रकल्पात लावलेल्या वृक्षांचे या सोहळ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप, अथवा सेटमुळे नुकसान होऊ लागले आहे. या सेटच्या आधारासाठी उभारलेले खांब अनेकदा या मियावाकी प्रकल्पातील लावलेल्या झाडांमध्ये ठोकले जात आहेत. अनेकदा या झाडांच्या मुळांना बाधा पोहचत असून वृक्षांचे नुकसान होऊ लागले आहे.

**झाडांमध्ये अडकतोतय कचरा**

विविध कार्यक्रम उरकल्यावर राहिलेला कचरा, हा झाडांमध्ये टाकला जात आहे. वाऱ्याने हा कचरादेखील झाडांमध्ये अडकून पडत असून, त्यामुळे या प्रकल्पाला कचऱ्याने वेढले आहे.

**टॉयलेट उभारण्याची गरज**

या झाडांचा आधार खुल्यावर टॉयलेट करण्यासाठी घेतला जात आहे. त्यामुळे या झाडांच्या परिसरात दुर्गंधी येत असून, डासांचे प्रमाण वाढलेले आहे. पालिकेने या ठिकाणी कायमस्वरूपी शौचालय उपलब्ध करून देण्याची गरज असून, त्यामुळे मैदान व परिसर स्वच्छ राहण्यास मदत होईल, अशी मागणी नागरीक करत आहेत.

# नवी मुंबई मनपा रुग्णालयातील कामचुकार लिफ्टमनवर कारवाई करा

## रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपाच्या नेरूळ, वाशी आणि ऐरोली या तीनही रुग्णालायत रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना लिफ्टमधून जाण्यास व येण्यास सहकार्य व्हावे म्हणून नवी मुंबई मनपा आरोग्य विभाग यांच्या कडून लिफ्टमनची भरती करण्यात आली. त्यांना किमान वेतनही देण्यात येत आहे, परंतु संबंधित लिफ्टमन आपले कर्तव्य आणि जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडत नसल्याचा आरोप रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे. हे लिफ्टमन सातत्याने मोबाईलवर मग्न असतात तर काही जण ड्युटीवर कार्यरत असताना गायब असतात. अशा लिफ्टमनवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

नवी मुंबई मनपाची नेरूळ, वाशी व ऐरोली येथे तीन रुग्णालये आहेत. या ठिकाणी तीनही पाळीत लिफ्टमन कार्यावर ठेवले आहेत. या लिफ्टमनची जबाबदारी ही रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना इच्छित ठिकाणी ने–आण करणे हे आहे, परंतु आपल्या कर्तव्यावर असणारे संबंधित लिफ्टमन हे बहुतांशी वेळेला लिफ्टमध्ये नसतात, तर काही लिफ्टमन गायबही झालेले असतात. तर काही लिफ्टमन लिफ्टच्या दरवाज्याजवळ आपल्या मोबाईलमध्ये

नवी मुंबई मनपाच्या ऐरोली, नेरूळ आणि वाशी या तीनही रुग्णालयांच्या वैद्यकीय आरोग्य अधीक्षक आणि विद्युत विभाग यांना याबाबत कळविण्यात येऊन पुढील कारवाई करण्याचे आदेश देतो.

**–डॉ. प्रशांत जवादे,**
मुख्य वैद्यकीय अधिकारी, नवी मुंबई मनपा

गेम किंवा करमणुकीच्या खेळात मग्न असल्याचे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी बोलताना सांगितले. लिफ्टमन हे रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांना अपेक्षित अशी सेवा देत नसल्याचे वास्तव तिन्ही रुग्णालयात दिसून येत आहे.

नवी मुंबई मनपाच्या तीनही रुग्णालयात कार्यरत असणाऱ्या लिफ्टमनला सुमारे वीस हजारच्या आसपास मासिक वेतन मनपा अदा करत आहे. या लिफ्टमनना फक्त रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची सेवा करणे इतके अभिप्रेत आहे. त्याचबरोबर लिफ्टमध्ये तांत्रिक अडचण, बंद पडणे आदी घटना घडल्या तर त्यावर उपाय शोधून रुग्ण व नातेवाईकांना व्यवस्थित बाहेर आणणे हा उद्देश आहे, परंतु यातील जास्तीत जास्त लिफ्टमन आपल्या सेवेला न्याय देत नसल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत. अशा कामचुकारपणा करणाऱ्या लिफ्टमन कर्मचाऱ्यांना शोधून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# परदेशातून येऊन पार पाडले मतदानाचे कर्तव्य

**नवी मुंबई : बातमीदार**

परदेशी स्थायिक असलेल्या भारतीयांनी मतदानासाठी भारतात येऊन काहींनी मतदानाचे कर्तव्य पार पाडत आपले देशप्रेम दाखवून दिले.

नेरूळमधील राज कोठारी आणि सुचिता कोठारी ह्या गेले तीन महिने दुबईला होत्या. १८ तारखेला त्यांना २० मे ला मतदान तारीख कळली. २० मे रोजी भारतात येऊन संध्याकाळी ५.५५ ला सगळ्यात शेवटी त्यांनी मतदान केले. नेरूळमधील किशोर ढाले हे पेट्रोलियम कंपनीत कामाला असून त्यांची गेल्या दोन महिन्यांपूर्वीच पश्चिम बंगाल येथे बदली झाली. ते फक्त मतदार यादीत नाव असल्यामुळे आणि देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी नेरूळमध्ये मतदानासाठी आले होते.

ऐरोली सेक्टर ०७ मधील अरुणा विशाल भोसले ह्या अमेरिकेत न्यू जर्सी येथे असतात. त्या खास मतदानासाठी आपल्या सहा वर्षांच्या लहान मुलीसोबत मतदानाच्या दुपारी २ वाजता पोहचल्या. त्यांनी दुपारी साडे तीन वाजता मतदान करत आपली जबाबदारी पार पाडली. सिंगापूरमध्ये गेले अनेक वर्ष राहत असलेले सानपाडा येथील दीक्षित कुटुंबीय यांनी देखील नवी मुंबईत दाखल होत मतदान करत बेजबाबदार नागरीकांना आपल्या कृतीतून जाणीव करून दिली.



**कळंबोली : भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुभाष कदम यांना वाढदिवसानिमित्त माजी नगरसेवक अमर पाटील, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, उत्तर भारतीय सेलचे मंडळ अध्यक्ष केशव यादव, कळंबोली शहर उपाध्यक्ष आबा घुटुकडे, भाजप नेते अमरजीत सिंग, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, युवा मोर्चा सरचिटणीस निशांत गील आदी पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.**

# अटलसेतूवरील कर्मचाऱ्याला दमदाटी करणाऱ्यावर कारवाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई ते उरण या मार्गावरील अटलसेतू पुलाने प्रवास करत असताना अटलसेतूवरील टोलनाका कर्मचाऱ्याला उद्धट बोलल्यास थेट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद होऊ शकतो. बुधवारी दुपारी पावणेबारा वाजता टोलनाक्यावरील एका महिला कर्मचाऱ्याला शिविगाळ व दमदाटी केल्याने एका मोटार चालकावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अटलसेतूवरुन ४९ वर्षीय हारुण पटेल हे मोटार चालवित असताना अटलसेतू येथील टोलनाक्यावर हर्षदा कोळी या पथकर जमा करण्याचे काम करत असताना ही घटना घडली. हारुण यांनी मोटार न थांबवल्याने त्यांच्या गाडीच्या पुढील बाजूवर बूमबॅरीअर पडले. यामुळे संतापलेल्या हारुण यांनी हर्षदा यांना शिविगाळ व दमदाटी केल्याची तक्रार न्हावाशेवा पोलिसांत हर्षदा यांनी केली.

## निवडक

### प्रणाली खैरे सुधागडातून अव्वल

**पाली :** बारावी परीक्षेत पालीतील ग.बा. वडेर व व. ग. ओसवाल ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी प्रणाली खैरे हिने ८०.८३ टक्के मिळवून सुधागड तालुक्यात प्रथम आली आहे. प्रणालीची घरची परिस्थिती अतिशय हलाखीची असून तिची आई सुषमा व वडील श्याम हे मोलमजुरी करतात. अत्यंत खडतर परिस्थितीवर मात करीत प्रणालीने हे यश संपादन केले आहे. प्रणालीच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या यशात प्रा. संतोष भोईर यांचा मोलाचा वाटा आहे, तसेच तिच्या शिक्षकांनीदेखील तिला महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

### ॲड. नंदा देशमुख कॉलेजचे सुयश

**अलिबाग** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२३मध्ये घेण्यात आलेल्या इ. बारावी परीक्षेत कोएसोच्या अलिबाग येथील ॲड. नंदा देशमुख इंग्रजी माध्यम ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विज्ञान शाखेत श्रुती सुर्यवंशी ८३.८३ टक्के प्रथम, पार्थ मानकर ७९.५० टक्के द्वितीय, तर दिव्या सुतार ७७.३३ टक्के तृतीय; वाणिज्य शाखेत दिव्या संकलेशा ९२.८३ टक्के प्रथम, श्रवण म्हात्रे ९१.५ टक्के द्वितीय, जान्हवी सिनकर ९१ टक्के मिळवत तृतीय आली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

### सलग तीन महिने पथदिवे सुरूच


**चौक** : वीज वितरण कंपनीचे कर्मचारी आणि देखभाल दुरूस्ती करणारे ठेकेदारांच्या दुर्लक्षामुळे खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत वावंढळ हद्दीतील पथदिवे गेले तीन महिने सुरू आहेत. सरपंचांनी वारंवार तक्रार करूनदेखील हा वीजपुरवठा खंडित करण्यात आला नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत उपकार्यकारी अभियंता मुंढे यांनी सांगितले की, वीजपुरवठा करणाऱ्या वीजवाहिन्या, विद्युत खांब यांची दुरूस्तीचे काम वीज वितरण कंपनीकडून सुमारे पाच महिन्यांपूर्वी कऱण्यात आले. यात ग्रामस्थांना होणारा कमी जास्त वीजभार, अनियमितपणा, विद्युत खांब बदलणे, खांबांना सपोर्ट सिस्टीम देणे, ट्रान्सफॉर्मर याबाबतच्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे पहिल्यापेक्षा सुधारणा झाली असून उर्वरित काम करण्यात येणार असल्याचे उपकार्यकारी अभियंता मुंढे यांनी सांगितले.

# रायगडातील ‘हापूस’चा सातासमुद्रापार डंका

## आखाती देश, युरोपमध्ये मोठी मागणी

**पाली : प्रतिनिधी**

कोकणचा हापूस आंबा त्याच्या उत्तम चवीसाठी व अप्रतिम गोडीसाठी प्रसिद्ध आहे. कोकणचा हा हापूस आंबा आता जागतिक बाजारपेठेत पोहचला असून या आंब्याला आखाती देशांसह युरोप, अमेरिकेत मोठी मागणी असल्याचे अलिबाग येथील आंबा बागायतदार संदेश पाटील यांनी सांगितले.



कोकणचा हापूस रंग, सुगंध आणि चव यावरून ओळखता येतो. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे या ठिकाणी हापूसचे उत्पादन होते. यावर्षीचा विचार केला तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हापूसचे उत्पादन अधिक आहे, तर अन्य जिल्ह्यात आंबा उत्पादनात घट झाली आहे. रायगडमध्ये ३० टक्केपेक्षा उत्पादन कमी आहे. सध्या कीटक आणि रोगाचा प्रादूर्भाव अधिक परिणामकारक ठरत आहे. यावर्षी कोकणातील पाचही जिल्ह्यात फुलकिड्याने आंबा बागायती व्यापल्या आहेत. त्यामुळे आंबा बागायतदार संकटात आहेत. खराब हवामानाचा, उष्णतेचा आंबा उत्पादनाला फटका बसला असून कोकणातील आंबा बागायतदार संकटात असल्याचे दिसत आहे. कोकणातील पाच जिल्ह्यात जो आंबा पिकतो, तोच हापूस आंबा आहे. इतर ठिकाणचा आंबा हापूस नाही. इतर राज्यातील आंबा हापूससदृश आंबा असतो. त्या आंब्याला हापूसचा स्वाद नसतो. आज अलिबागपासून पनवेलपर्यंत रस्त्यावर विक्रीसाठी आंबा विक्रीस आला आहे, मात्र यात हापूसच्या नावाखाली ग्राहकांची फसवणूक होते. हापूस आंब्याचा रंग, स्वाद आणि सुगंध यावरून ओळखता येतो. ग्राहकांनी आंबा विकत घेताना कोकणातील आंबा बागायतदार, शेतकऱ्यांशी संपर्क साधून आंबा खरेदी करावा तसेच आम्ही जो जीआय टॅग मिळवले आहे ते पाहून आंबे घ्यावेत.

आम्ही यावर्षीपासून पीआर कोड लावत असून ग्राहकांनी तपासून रिसर्च शोधून आंबे खरेदी करावेत, असे आवाहन संदेश पाटील यांनी केले आहे.

रायगडातील हापूसचा सातासमुद्रापर डंका असून यामध्ये आखाती देश, युरोप, व अमेरिका यांचा समावेश आहे. या देशात हापूसला मोठी मागणी आहे. आंब्याचे प्रकार सांगताना हापूस, केशर, राजापुरी पायरी, तोतापुरी, नीलम या जाती आहेत. एकूण नाव असलेल्या २४३ जाती आहेत. नाव न दिलेल्या गावरान जाती पुष्कळ आहेत. इतर राज्यात लंगडा बनारस, चौसा, बैगन पल्ली, लालबा या जाती आहेत. हापूस आंबा दर्जेदार व रुचकर असल्याने मागणी मोठी आहे.

### गोखले महाविद्यालयातील महेरीन शेख प्रथम

**श्रीवर्धन : बातमीदार**

येथील गोखले महाविद्यालयातील वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी महेरीन हीफजू रहमान शेख हिने बारावीच्या निकालामध्ये ६८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबद्दल मेमन समाजाचे माजी अध्यक्ष जाफर मेमन, आराठी ग्रामपंचायतीचे सदस्य टिनू शेख यांनी महेरीन हीफजू रहमान शेख हिला पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार केला व अभिनंदन केले. तिने मिळविलेल्या या यशाबद्दल विविध मान्यवरांनीदेखील तिचे अभिनंदन केले आहे.

## माथेरानमध्ये पावसाळापूर्व कामांना आली गती

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाण्याचे ओहोळ वाहत असल्याने काही ठिकाणी मातीची धूप होते. रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या ब्रिटिशकालीन मोऱ्या दरवर्षी मातीच्या भरावाने भरत असतात. त्यामुळे पावसाळी पाणी थेट रस्त्यावरून वाहते. परिणामी रस्त्याची धूप होऊन रस्ते खड्डेमय होत असल्याने हातरिक्षा, घोडा तसेच पादचाऱ्यांना त्रासदायक बनते. यासाठी अनेक भागातील पावसाळी गटारांची साफसफाई करून चांगल्या पद्धतीने गटारे आणि मोऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे. या मोऱ्यांवर बांधलेल्या कठड्याचा वापर पायी जाणाऱ्या पर्यटकांना बसण्यासाठी होत आहे.

पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे आणि मोऱ्यांची कामे अत्यंत नियोजन पद्धतीने होत आहेत.



## मुरूड शहरात गटारांची साफसफाई

**मुरूड : प्रतिनिधी**

पाऊस काही दिवसांवर येऊन ठेपल्याने नगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व साफसफाईची कामे हाती घेतली असून शहरातील गटार सफाईच्या कामाला गती मिळाली आहे.



शहरात जवळपास ३५ किमीची गटारे व पाच किमीचे मुख्य नाले आहेत. पालिकेकडून एप्रिल व मे महिन्यात गटारांची साफसफाई केली जाते. साफसफाईचा ठेका व्हि.डी. के.पुणे या कंपनीस दिला गेला आहे. नालेसफाईचे काम आतापर्यंत ५० टक्क्यांपेक्षा जास्त पूर्ण झाले आहे. असून ३० मेपर्यंत साफसफाईची कामे पूर्ण होतील, अशी माहिती आरोग्य निरीक्षक राकेश पाटील यांनी दिली आहे.

मुरूड तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे पाणी निचरा करण्यासाठी मोठ्या पंपाद्वारे पाणी इतर ठिकाणी नेण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना राबवणे खूप आवश्यक आहे. शहरात ज्या ठिकाणी पाणी साचते त्याबाबत माहिती मिळताच एक पथक तैनात केले जावे व त्या पथकाकडून नागरिकांना तातडीने दिलासा देणारे काम करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## मुरूड आगारात नवीन बसेसची शिवसेनेकडून मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा येथे पर्यटकांची नेहमीच गर्दी होते, परंतु मुरूड आगारात जुन्या व जीर्ण बसेसमुळे पर्यटकांसह स्थानिकांमध्ये नाराजी आहे, तसेच आगरदांडा जेटीवरील बससेवा पूर्ववत व्हावी यासाठी बुधवारी (दि.२२) शिवसेनेतर्फे आगार व्यवस्थापक आर. एस. शिंदे यांना निवेदन देण्यात आले.



या वेळी उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, तालुकाप्रमुख ऋषीकांत डोंगरीकर, उपतालुका प्रमुख भगीरथ पाटील, मनोज कमाने, तालुका संघटक दिनेश मिणमिणे, यशवंत पाटील, दीपेश वरणकर, माजी सरपंच संतोष पाटील, हरिश्चंद भेकरे, निलेश तांबडकर, महेश पाटील, आदाड शिवसेना प्रमुख नितेश पाटील, अविनाश शिंदे उपस्थित होते.

मुरूड आगारात आमदार महेंद्र दळवी यांच्या पाठपुराव्यानंतर १० नवीन बसेस आलेल्या परत गेल्या. एसटी बसेसची स्वच्छता नाही. जुन्या बसेसमुळे ब्रेकडाऊनचे प्रमाण वाढलेले आहे. प्रवासी थांब्यावर बसेस न थांबविणे आदी समस्या कार्यकर्त्यांनी मांडल्या.

आगार व्यवस्थापक शिंदे म्हणाले की, साळाव पुलावरून एसटीला परवानगी सार्वजनिक नाकारल्याने बसेस परत गेल्या. मागील आठवड्यात पाणीपुरवठा खंडीत झाल्याने बसेसची स्वच्छता करता आली नाही, तसेच आगरदांडा जेट्टीसह विद्यार्थ्यांसाठी बसेसची लेखी मागणी केल्यास या मार्गावर बस सुरू करण्याचे आश्वासन दिले.

### मुरूड जंजिरा रहिवासी संघाकडून निवेदन


अलिबाग–मुरूड सकाळी ७.१५ वा. एसटी पुन्हा सुरू करण्याकरिता मुरूड जंजिरा रहिवासी संघाकडून निवेदन देण्यात आले. या गाडीमधून अलिबाग येथून सर्व वर्तमानपत्रांची पार्सल येत असतात, परंतु गाडी बंद केल्याने पेपर खूप उशिरा मिळत असल्याचे अशोक कमाने यांनी सांगितले. या वेळी दिलीप गुंजाळ, अशोक कमाने, दिगंबर केळुस्कर, विकास मिरजणकर, अशोक दिवेकर, शैलेश वारेकर आदी उपस्थित होते.

## सीडबॉलच्या माध्यमातून जंगलात वृक्षारोपण

### सहजसेवा फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**खालापूर, चौक, खोपाली : प्रतिनिधी**

दरवर्षी वाढणारे उष्णतेचे प्रमाण पाहता वृक्षांची जोपासना करणे गरजेचे आहे. आधुनिकतेच्या नावाखाली होत असलेली वृक्षतोड हा सर्वत्र चिंतेचा विषय बनलेला आहे. पर्यावरणाचे भान राखताना वृक्ष लागवड करणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. कर्तव्याच्या भूमिकेतून सहजसेवा फाउंडेशन नेहमीच उपयोगी उपक्रम राबवित असते. सहजसेवा फाउंडेशन यावर्षी सीडबॉलच्या माध्यमातून सह्याद्रीच्या जंगलात वृक्षारोपण करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे.



सहजसेवेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर पाऊस सुरू झाल्यानंतर आपल्या जवळपासच्या जंगलात सीडबॉल फेकून झाडे उगविण्यास पुढाकार घेत आहे. या उपक्रमात सीडबॉल अथवा झाडाच्या बिया देऊन ‘सहज’पणे सामिल होण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

सहजसेवा फाउंडेशनतर्फे चला वृक्षमित्र बनूया, अशी साद देत पावसाच्या सुरुवातीला दऱ्याखोऱ्यात सीडबॉल उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात गड्थ उत्कर्ष महिला मंडळ खोपोली, वनविभाग खालापूर, लिओ क्लब ऑफ वाशी वर्चुज, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद शाळा, आध्यात्मिक शिक्षण संस्था (गुरुकुल) महड, सेंट मेरिज स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज खरसुंडी सक्रिय सहभागी होणार आहेत.

सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशीका शेलार, सचिव अखिलेश पाटील, सहसचिव नम्रता परदेशी, खजिनदार संतोष गायकर, सहखजिनदार बनिता साह, महिला संघटक निलम पाटील, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, दिवेश राठोड, उबेद पटेल, अशोक ठकेकर, तुषार अगरवाल, आश्पाक लोगडे तसेच उपक्रम प्रमुख समीर साठे, सहज युवाचे सागरिका जांभळे, मारिया दुस्ते, सोहम ढोकळे, साहिल जांभळे, संचिता पाटील यासाठी मेहनत घेत आहेत.

## नांगरवाडी गावात ‘वणवा’ नाट्यप्रयोग यशस्वी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

श्री धावीर नाट्यमंडळ आयोजित व श्री सुनील धुमाळ लिखित आणि दिग्दर्शित वणवा हे एड्सवर आधारित नाटक रामराज विभागातील नांगरवाडीच्या रंगभूमीवर नुकतेच सादर करण्यात आले. अनेकदा समजामध्ये एड्ससारख्या आजारांबाबत गैरसमजाचे चित्र असते. या गैरसमजुतीमुळे नात्यांमध्ये येणारा ताण, त्यातील दुरावा याबाबतचे चित्र नाटकातून दर्शवले आहे.

वणवा हे नाटक वास्तव अत्यंत भेदकपणे मांडते. लेखक आणि दिग्दर्शक सुनील धुमाळ यांनी समाजातील वास्तवाचा हा उभा आडवा छेद अत्यंत आक्रमक पद्धतीने मांडला आहे.

सुरुवातीचे प्रा. रमेश धुमाळ यांचे सूत्रसंचालन लक्षवेधी ठरले आणि नाटकाची नांदी आसमंतात गुंजत गेली. गणेश धुमाळ, महादेव पाटील, प्रकाश झावरे, सुबोध धुमाळ यांनी संयमीत व्यक्तिमत्त्वाचा, नितळ विचारधारेचा आणि स्वच्छ भूमिकेचा नेमकेपणा उभा केला. विकास झावरे आणि त्यांच्या फॅमिलीचे नाटकातील छोटेसे लक्षवेधी आगमन भर उन्हात एखादी थंडगार गारव्याची अंगावर सर यावी तसे झाले.

वसंत धुमाळ, परेश पाटील, हर्षल धुमाळ, मोहन धुमाळ, संजोग केतन या नवीन कलाकारांनी अतिशय उत्तमरित्या भूमिका साकारल्या. गौतमी (हेमा)आणि कांचन (निलम), श्रेया (नयना) या तिघींनी प्रेक्षकांना प्रेमळ अनुभूती देत प्रेक्षकांची मने जिंकली.



## पुस्तकपेढी योजनेचा पेण तळे येथे शुभारंभ

### २०० विद्यार्थ्यांना लाभ मिळणार



**माणगाव : प्रतिनिधी**

कोरोना काळात गरजूंना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे या हेतूने सुरू करण्यात आलेल्या मारुती फाउंडेशनच्या पुस्तकपेढी योजनेचा मंगळवारी (दि.२१) पेण तळे येथे शुभारंभ करण्यात आला.

गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व्हावी हा उद्देश समोर ठेवून इ. नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात वर्षभरासाठी पूर्णपणे मोफत पाठ्यपुस्तक संच भेट दिला जातो. वर्षभर संच वापरल्यानंतर फाउंडेशनकडे परत केला जातो. हा संच दुसऱ्या विद्यार्थ्यांना वापरण्यास मिळतो. त्यामुळे विद्यार्थी पालकांना वेळेत पुस्तके मिळतात व खरेदी करण्याचा आर्थिक भार हलका होत आहे. गेल्या चार वर्षांत १५०हून अधिक विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. गरजूंना या योजनेचा लाभ मिळत असल्याने सामाजिक क्षेत्रातून या पुस्तकपेढी योजनेचे कौतुक होत आहे.

पेण तळे येथे गावाचे उपाध्यक्ष सीताराम पोटले, सामाजिक कार्यकर्ते मंगेश भागडे, नयन पोटले, नारायण मोंडे, प्रकाश मांडवकर, साईनाथ पोटले व फाउंडेशनचे अध्यक्ष अजित शेडगे यांच्या हस्ते या योजनेचा या शैक्षणिक वर्षातील शुभारंभ करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्त्या अनुया आपटे, निर्धार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष निलेश अहिरे, सामाजिक कार्यकर्ते प्रसाद उभारे, किशोर वेदपाठक, नागरिक फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. दीपक देशमुख, भालचंद्र खाडे, शंकर शिंदे, आई कनकाई संस्थेचे अध्यक्ष सुशील कदम आर्दींच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या या योजनेसाठी फाउंडेशनचे आधारस्तंभ बाळाराम मांडवकर, सुमित मोंडे, अरुणा मांडवकर, अनघा शेडगे यांचे योगदान व मार्गदर्शन लाभत आहे.

यावर्षी या योजनेतून २०० विद्यार्थी मदतीचा लाभ घेतील, असा विश्वास फाउंडेशनचे अध्यक्ष अजित शेडगे यांनी व्यक्त केला आहे. या योजनेस सहाय्यभूत होण्यासाठी समाजातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी सहभाग घेण्याचे आवाहन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.



## माणगावात रुग्णांच्या सेवेला सिटीस्कॅन मशिन दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

दक्षिण रायगडमधील तसेच महामार्गावरील अपघातग्रस्त व इतर रुग्णांना तातडीचे उपचार मिळावेत यासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅन मशीनची अत्यंत गरज होती. ही सिटीस्कॅन मशीन उपजिल्हा रुग्णालयात बसविण्यासाठी आमदार भरत गोगावले यांनी प्रयत्न केले होते. हे सिटीस्कॅन उपजिल्हा रुग्णालयात बसविले असून रुग्णांच्या सेवेला आता ते उपलब्ध झाले आहे.

शिवसेना युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्याकडे ३१ जुलै २०२३ रोजी लेखी पत्र देऊन मागणी केली होती. त्याचबरोबर आ. भरत गोगावले यांचेमार्फत हा प्रश्न शासन दरबारी लावून धरला होता. अखेर हे सिटीस्कॅन सुरू झाले असून विपुल उभारे व युवासेनेचे पदाधिकारी वैभव मोरे व कार्यकर्त्यांनी उपजिल्हा रुग्णालयातील सिटीस्कॅन कक्षाला भेट देऊन सर्व टीमचे स्वागत केले. माणगावात हे सिटीस्कॅन सेवा सुरू झाल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# राजस्थान रॉयल्सकडून आरसीबीचे स्वप्न भंगले

## क्वालिफायर २मध्ये राजस्थानचे स्थान पक्के



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमिअर लीग २०२४च्या एलिमिनेटर सामन्यात राजस्थान रॉयल्सने बाजी मारली. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला आणखी एका पर्वात जेतेपदाच्या चषकापासून दूर रहावे लागणार आहे. स्टार फलंदाजांचे अपयश, कमकुवत क्षेत्ररक्षण आणि सुमार गोलंदाजीने आरबीचा घात केला. हा सामना जिंकून राजस्थानने क्वालिफायर २मध्ये स्थान पक्के केले आणि त्यांना सनरायझर्स हैदराबादचा सामना करावा लागणार आहे. हा सामना शुक्रवारी (दि.२४) चेपॉकवर होणार आहे.

राजस्थानच्या सलामीवीर यशस्वी जैस्वाल व टॉम कोह्लेर-कॅडमोर (२०) यांनी ४६ धावा जोडल्या. यशस्वीने ३० चेंडूंत ८ चौकारांच्या मदतीने ४५ धावा केल्या. कर्ण शर्माने कर्णधार संजू सॅमसनला १७ धावांवर यष्टिचीत केले. राजस्थानने १० षटकांत ८६ धावांवर ३ फलंदाज गमावले होते. १४व्या षटकात विराट कोहलीच्या भन्नाट थ्रोवर ध्रुव जुरेलला (८) रनआऊट होऊन माघारी जावे लागले. राजस्थानला ३६ चेंडूंत ५८ धावा करायच्या होत्या आणि त्यांच्या हातात सहा विकेट्स होत्या.

रियान पराग व शिमरोन हेटमायर यांनी १५व्या षटकात ११ धावा मिळवल्या, त्यानंतर रियानने १६व्या षटकात कॅमेरून ग्रीनची धुलाई करून १७ धावा मिळवल्या. २४ चेंडूंत ३० धावा असा सामना या दोघांनी खेचून आणला. १७ चेंडूंत १६ धावा हव्या असताना रियान परागचा त्रिफळा मोहम्मद सिराजने उडवला. पराग २६ चेंडूंत २ चौकार व २ षटकारांसह ३६ धावा करून परतला. शेवटच्या चेंडूवर फॅफ ड्यू प्लेसिसने अविश्चसनीय झेल घेऊन १४ चेंडूंत २६ धावा करणाऱ्या हेटमायरला माघारी पाठवले.

१२ चेंडूंत १३ धावा राजस्थानला करायच्या होत्या आणि रोव्हमन पॉवेल व आर अश्विन ही जोडी मैदानावर उभी होती. फर्ग्युसनच्या पहिल्या दोन चेंडूवर पॉवेलने चौकार खेचले आणि सहाव्या चेंडूवर षटकार खेचून सामना जिंकला. राजस्थानने १९ षटकांत ६ बाद १७४ धावा केल्या आणि ४ विकेट्सने विजय मिळवला. पॉवेल ८ चेंडूवर १६ धावांवर नाबाद राहिला. तत्पूर्वी, विराट कोहली (३३), कॅमेरून ग्रीन (२७), रजत पाटीदार (३४) व महिपाल लोम्रोर (३२) यांनी संघाला ८ बाद १७२ धावांचा सन्मानजनक पल्ला गाठून दिला. ट्रेंट बोल्टने पहिल्या स्पेलमध्ये (३-०-६-१) आरसीबीवर दडपण निर्माण केले. आर अश्विनने (२-१९) सलग दोन विकेट्स घेऊन राजस्थानला मोठे यश मिळवून दिले. युझवेंद्र चहलने धोकादायक विराटची महत्त्वाची विकेट घेतली. आवेश खानने ३ विकेट्स घेऊन आरसीबीचे कंबरडे मोडले.

दरम्यान, भारताचा फिनिशर आणि स्टार यष्टीरक्षक फलंदाज असलेल्या दिनेश कार्तिकने आयपीएलला अलविदा केले आहे. कार्तिकचा राजस्थान रॉयल्सविरुद्धचा एलिमिनेटर सामना हा अखेरचा आयपीएल सामना होता. हा हंगाम सुरू होण्यापूर्वीच दिनेश कार्तिकने घोषणा केली होती की, हा त्याचा शेवटचा आयपीएल हंगाम असेल. एलिमिनेटर सामन्यात आरसीबीकडून झालेल्या पराभवानंतर जेव्हा तो ड्रेसिंग फॉर्ममध्ये परतत होता, तेव्हा त्याने हातात ग्लोव्हज घेऊन प्रेक्षकांचे आभार मानत त्यांचा निरोप घेतला. यावरून त्याने त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील शेवटचा सामना खेळल्याचे नक्की झाले. आरसीबीच्या पराभवानंतर संपूर्ण संघासह दिनेश कार्तिकचा चेहराही उतरला होता, विराटने त्याची गळाभेट घेत त्याचे सांत्वन केले.

## मलेशिया मास्टर्स स्पर्धेत सिंधूची विजयी सलामी

**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

भारताच्या दोन ऑलिम्पिक पदकविजेत्या पी. व्ही. सिंधूने मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ५०० दर्जा) बुधवारी (दि.२२) विजयी सलामी दिली. जागतिक क्रमवारीत १७व्या स्थानी असणाऱ्या सिंधूने स्कॉटलंडच्या ख्रिास्टी गिलमोरला २१-१७, २१-१६ असे सरळ गेममध्ये नमवत महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले. आता सिंधूसमोर कोरियाच्या सिम यू जिनचे आव्हान असेल.



अन्य सामन्यात भारताच्या अश्मिता चलिहाने चायनीज तैपेइच्या लिन सिह युनवर २१-१७, २१-१६ असा विजय मिळवला. पुरुष एकेरीत भारताच्या किरण जॉर्जने जपानच्या ताकुमा ओबायाशीला २१-१६, २१-१७ असे पराभूत केले. मिश्र दुहेरीत जागतिक क्रमवारीत ५३व्या स्थानी असणाऱ्या बी. सुमीत रेड्डी आणि एन. सिक्की रेड्डी जोडीने पात्रता फेरीतून आगेकूच केलेल्या हाँगकाँगच्या लुइ चुन वाइ आणि फु चि यान जोडीला २१-१५, १२-२१, २१-१७ असे नमवत दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले.

पुरुष दुहेरीच्या सामन्यात भारताच्या कृष्ण प्रसाद गारगा आणि साई प्रतीक जोडीने मिंग चेन लू व टँग काइ वेई जोडीला २३-२१, २१-११ असे नमवले.

## महाराष्ट्रातील तेजस शिरसेने मोडला राष्ट्रीय विक्रम

### पुरुषांच्या अडथळा शर्यतीत ठरला अव्वल भारतीय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

औरंगाबादमधील तेजस शिरसेने महाराष्ट्राच्या मुकुटावर जागतिक तुरा खोवला आहे. बुधवारी (दि.२२) झालेल्या जागतिक अॅथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर चॅलेंजरस्तरीय स्पर्धा मोटोनेट जीपी मालिकेत त्याने सुवर्णपदक जिंकून पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीत राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. दि प्रिंटने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.



२०१७मध्ये सिद्धांत थिंगल्यने १३.४८ सेकंदांचा विक्रम केला होता. त्याचा हा रेकॉर्ड आता तेजस शिरसेने मोडून १३.४१ सेकंदाचा नवा विक्रम केला आहे. तेजसने ९ मे रोजी नेदरलँड्समध्ये १३.५६ सेकंदांची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी केली होती.

शिरसेने कोणतेही आंतरराष्ट्रीय पदक जिंकलेले नाही, परंतु पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीत तो अव्वल आहे. त्याने गेल्या वर्षी फेडरेशन कप, राष्ट्रीय आंतरराज्य चॅम्पियनशिप आणि नॅशनल ओपनमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. परदेशात प्रशिक्षण आणि स्पर्धा करीत असल्याने त्याने यंदाच्या फेडरेशन कपमध्ये भाग घेतला नाही. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीसाठी स्वयंचलित पात्रता गुण १३.२७ सेकंद आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीत ४० खेळाडू भाग घेतील. यातील निम्मे जागतिक क्रमवारीत स्थान मिळवतील.

## हार्दिक-नताशा विभक्त होण्याच्या चर्चा

मुंबई : भारतीय अष्टपैलू खेळाडू आणि मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याची आयपीएल २०२४ मध्ये त्याची कामगिरी खूपच निराशाजनक होती. आता त्याच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही धक्कादायक माहिती समोर येत आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, हार्दिक आणि त्याची पत्नी नताशा स्टॅनकोविकमध्ये काहीतरी बिनसले आहे, अशी चर्चा सुरू आहे. हार्दिक पंड्याची पत्नी नताशाने तिच्या इन्स्टाग्रामवरून पंड्या आडनाव काढले आहे. यामुळेच सोशल मीडियावर त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाल्याचा अंदाज लावला जात असून यावर या जोडप्याने अद्याप कोणतेही उत्तर दिलेले नाही.

### जागतिक पॅरा अॅथलेटिक्स स्पर्धा

## महाराष्ट्राच्या सचिनला सुवर्ण; धरमबीरला कांस्य

**कोबे (जपान) : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या सचिन खिलारीने जागतिक पॅरा अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या गोळाफेक क्रीडा प्रकारातील एफ-४६ गटात आशियाई विक्रमासह सुवर्णपदक पटकावले, तसेच धरमबीरने क्लब थ्रो क्रीडा प्रकारातील एफ-५१ गटात कांस्यपदक मिळवित भारताला यंदाच्या स्पर्धेत १२ पदकांचा टप्पा गाठून दिला. यात पाच सुवर्णपदकांचा समावेश आहे. भारताची जागतिक पॅरा अॅथलेटिक्स स्पर्धेतील ही सर्वोत्तम कामगिरी आहे. यापूर्वी भारताने २०२३मध्ये पॅरिस येथे झालेल्या स्पर्धेत एकूण दहा पदके जिंकली होती.



सचिनने १६.३० मीटर लांब गोळाफेक करीत सुवर्णपदकाची कमाई केली. यासह त्याने आपलाच १६.२१ मीटरचा आशियाई विक्रमही मोडीत काढला, तसेच आता पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेसाठीही पात्रता मिळवली आहे.

दुसरीकडे, पुरुषांच्या क्लब थ्रो क्रीडा प्रकारातील एफ-५१ गटाच्या अंतिम फेरीत धरमबीरने पाचव्या प्रयत्नात ३३.६१ मीटरचे अंतर गाठत कांस्यपदक मिळवले. सर्बियाचा झेलिको डिमित्रिएविच (३४.२० मीटर) आणि मेक्सिकोचा मारिओ हर्नांडेझ (३३.६२ मीटर) हे अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्यपदकाचे मानकरी ठरले.

भारताने एकूण १२ पदकांसह (पाच सुवर्ण, चार रौप्य आणि तीन कांस्यपदके) पदकतालिकेतील तिसरे स्थान राखले आहे. अव्वल स्थानी असणाऱ्या चीनच्या नावे १८ सुवर्ण, १६ रौप्य आणि १४ कांस्यपदके, तर दुसऱ्या स्थानावरील ब्राझीलच्या नावे १७ सुवर्ण, आठ रौप्य आणि पाच कांस्यपदके आहेत.

## पराभवानंतर आरसीबीचा लाजिरवाण्या यादीत समावेश



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२४चा एलिमिनेटर सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि राजस्थान संघात रंगला. या सामन्यात राजस्थानने विजय पटकावला. या पराभवानंतर आरसीबीचे स्थान एका लाजिरवाण्या यादीत पोहचले आहे.

एलिमिनेटरमध्ये राजस्थानविरूद्धचा पराभव हा आरसीबीचा आयपीएल प्लेऑफमधील दहावा पराभव होता. आरसीबीने या यादीत सीएसके आणि दिल्लीला मागे टाकले. या दोन्ही संघांना प्लेऑफमध्ये नऊ पराभव पत्करावे लागले आहेत. दहावेळा प्लेऑफमध्ये पोहोचूनही इतकी गुणवत्ता असलेला संघ एकदाही विजेतेपद मिळवू शकला नाही.

दरम्यान, आरसीबीचा कर्णधार फाफ डू प्लेसिस पराभावावर म्हणाला की, आम्ही फक्त २० धावांनी कमी पडलो, संघाचे कौतुक केले पाहिजे कारण पहिल्या सामन्यांपैकी सात सामने आम्ही गमावले होते. तिथून परत इतकी मोठी मजल आम्ही मारली. परत लढत राहण्यासाठी आणि अखेरीस एलिमिनेटरपर्यंत पोहचण्यासाठी खूप मोठ मन लागते.

## तिरंदाजी विश्वचषक स्टेज २मध्ये भारतीय महिला संघ अंतिम फेरीत

**येचिओन (दक्षिण कोरिया) : वृत्तसंस्था**

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या भारतीय महिला कंपाऊंड तिरंदाजी संघाने बुधवारी (दि.२२) येचिओन (दक्षिण कोरिया) येथे अंतिम फेरीत धडक मारली. जागतिक क्रमवारीत १ क्रमांकाचा पुरुष कंपाऊंड संघ मात्र अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकला नाही. गेल्या महिन्यात शांघाय स्टेज १ मध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या ज्योती सुरेखा वेन्नम, परनीत कौर आणि अदिती स्वामी या महिला त्रिकुटाने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले.



पात्रता फेरीत दुसऱ्या स्थानावर राहिल्यानंतर उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवणाऱ्या भारतीय महिला संघासाठी हा एकंदरीत सोपा प्रवास होता. त्यांनी शेवटच्या आठमध्ये इटलीचा २३६-२३४ असा पराभव केला. मंगळवारी पात्रता फेरीत चौथ्या क्रमांकावर घसरलेल्या प्रियांश, प्रथमेश फुगे आणि अनुभवी अभिषेक वर्मा यांचा पुरुष संघ शूट-ऑफमध्ये ऑस्ट्रेलियाकडून १३३-१३३ (१०-१०*) असा पराभूत झाला.

जागतिक क्रमवारीत २१व्या क्रमांकावर असलेल्या ऑसीजने केवळ एक गुण घसरून ५९ धावांनी सुरुवात करून भारतीय त्रिकुटाला आश्चर्याचा धक्का दिला. बेली वाइल्डमॅन, ब्रँडन हॉवेस आणि जोनाथन मिल्ने यांच्या ऑसीज संघाने त्यांची चांगली धावसंख्या सुरू ठेवली आणि दुसऱ्या फेरीनंतर एका गुणाच्या कमतरतेने मात केली. त्यानंतरच्या शूट-ऑफमध्ये दोन्ही संघ ३०-असे होते, परंतु कांस्यपदक सुरक्षित करण्यासाठी ऑसीजने मध्यभागी बाण मारून विसंगत भारतीयांना बाहेर काढले.

व्हिएतनामवर २३५-२१२ असा सहज विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केल्याने भारताने डेन्मार्क आणि यूएसए यांच्यातील स्पर्धेवर मात केली आणि शूट-ऑफमध्ये दोन्ही सामने जिंकले.

## भारताचा प्रशिक्षक होण्याची ऑफर रिकी पाँटिंगने नाकारली

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक होण्यासाठी बीसीसीआयने निवेदन जाहीर केले आहे. रिकी पाँटिंग, स्टीफन फ्लेमिंग ही नाव सध्या चर्चेत आहेत. यादरम्यान भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक होण्यासाठी त्याच्याशी संपर्क साधण्यात आल्याची माहिती रिकी पाँटिंगने दिली, मात्र सध्या योग्य वेळ नसल्याचे त्याने म्हटले आहे. पाँटिंगने यामागचे कारणही सांगितले आहे.



मुख्य प्रशिक्षकपदासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख २७ मे ही आयपीएल फायनलच्या दुसऱ्या दिवशी आहे. ईएसपीएन क्रिकइन्फोने दिलेल्या एका अहवालात आधीच सांगितले आहे की, राहुल द्रविडला त्याचा कार्यकाळ वाढवू इच्छित नाही. यादरम्यान पाँटिंगने दिलेल्या वक्तव्याने सर्वांच लक्ष वेधले आहे. पाँटिंगने सांगितले की, त्याला राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक व्हायचे आहे, परंतु सध्या दिल्ली कॅपिटल्सचे (डीसी) मुख्य प्रशिक्षक असल्याने आणि ऑस्ट्रेलियातील संबंधित काम पाहता ही भूमिका स्वीकारणे योग्य वाटत नाही. त्याच्यासाठी ही वेळ योग्य नसल्याचे त्याने सांगितले.

## कामगार चषक आदिवासी कबड्डी स्पर्धेत ढेपेवाडी विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल अँड फर्टीलायझर्स (आरसीएफ) थळतर्फे अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय आदिवासी कबड्डी स्पर्धेत जय बापदेव ढेपेवाडी रोहा संघाने कामगार चषक पटकावला. धामणसई रोहा संघ उपविजेता ठरला.



म्हसोबा गावठाण, अलिबाग संघाने तृतीय तर वाघोबा क्रीडा मंडळ, खालापूर संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ खेळाडू उमेश पारधी, ढेपेवाडी-रोहा याला गौरविण्यात आले. कामगार दिनाचे औचित्य साधून आरसीएफ क्रीडासंकुल कुरुळ येथे कामगार चषक आदिवासी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ६४ आदिवासी संघ सहभागी झाले होते.

या वेळी आरसीएफचे मुख्य महाव्यवस्थापक नितीन हिरडे, महाव्यवस्थापक संजीव हरळीकर, उपमहाव्यवस्थापक विनायक पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक प्रशांत म्हात्रे, सर्व कामगार संघटनाचे प्रतिनिधी, ऑफिसर्स असोसिएशन, जनसंपर्क अधिकारी डॉ. राकेश कवळे, क्रीडा अधिकारी सोनार हे उपस्थित होते.

## सीएसकेचा माजी खेळाडू अंबाती रायुडूने आरसीबीच्या पराभवानंतर पुन्हा उडवली खिल्ली

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२४मधील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा प्रवास संपला आहे. आरसीबीचा संघ आतापर्यंत सर्व १७ हंगाम खेळणारा संघ, पण आजपर्यंत कधीही विजेतेपद जिंकू शकलेले नाही. आरसीबीने त्यांच्या शेवटच्या साखळी सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा पराभव करून प्लेऑफचे स्थान पटकावले होते. या सामन्यानंतर आरसीबीच्या चाहत्यांनी सीएसकेच्या चाहत्यांना चिडवतानाचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले, पण चाहत्यांशिवाय माजी सीएसके क्रिकेटर अंबाती रायुडूने सीएसकेचा हा पराभव खूपच मनावर घेतला आहे.

सीएसके आणि आरसीबीचे चाहते एकमेकांना चिडवत होते, पराभवानंतर आनंद साजरा करत होते, पण या सगळ्यात अंबाती रायुडूही मागे नव्हता.



त्याने सामन्यानंतर त्याच्या इन्स्टाग्रामवर एक व्हीडिओ पोस्ट करीत आरसीबीला चिडवले आहे.

रायुडूने सीएसकेचा एक जुना व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये अजिंक्य रहाणे, रवींद्र जडेजा, ऋतुराज गायकवाड आणि डेव्हन कॉनवे दिसत आहेत. हे सर्व खेळाडू बसमध्ये पाच आयपीएल ट्रॉफी मिळाल्याचा विजय साजरे करीत आहेत. हा व्हीडिओ शेअर करीत त्याने आरसीबीला चेन्नईसारख्या संघाला साधं समजू नये, पाच आयपीएल ट्रॉफी जिंकलेला हा संघ आहे, असे जणू तो त्यांना सांगत आहे.

रायुडूने आरसीबीने राजस्थानविरूद्धचा सामना गमावल्यानंतर फाफ डू प्लेसिसच्या संघावर चांगलाच निशाणा साधला. स्टार स्पोर्ट्सबरोबर चर्चा करताना रायुडू म्हणाला, आरसीबीने हे समजून घेतले पाहिजे की, ते आक्रमक सेलिब्रेशन करून आयपीएल ट्रॉफी जिंकू शकत नाहीत. फक्त चेन्नई सुपर किंग्जला हरवले म्हणजे आयपीएल ट्रॉफी जिंकली असे होत नाही. त्यासाठी तुम्हाला एक टीम म्हणून प्लेऑफमध्ये चांगली कामगिरी करावी लागेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com